www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

संपादक - संतोष शिवदास आमले

मुख्य संपादक - भारती आमले | उपसंपादक - श्री विलास गायकवाड | कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे | निवासी संपादक- श्री राकेश पाटील | सह संपादक - श्री मुकुंद कांबळे | महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : ७३ शुक्रवार २१ नोव्हेंबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## नॅशनल बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये पनवेलच्या रोणाल पाटीलने पटकाविले रौप्यपदक ; आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सत्कार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

पंजाब येथे नुकत्याच पार पडलेल्या १६ व्या नॅशनल बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत महाराष्ट्र संघाकडून प्रतिनिधीत्व करत उज्ज्वल कामगिरी करून रजत पदक जिंकण्याचा मान पनवेल तालुक्यामधील केवाळे गावातील कु. रोणाल महेश पाटील याने मिळवला असून त्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सत्कार त्याचा करण्यात आला.



रोणाल हा युनाइटेड शोटोकान कराटे असोसिएशन इंडिया (निलेश फाईटर ) या अकॅडेमीमध्ये प्रशिक्षक योगेश बैकर यांच्याकडून बॉक्सिंगचे धडे घेत आहे. अमृतसर येथे झालेल्या या स्पर्धेत देशभरातील अनेक राज्यांमधून उत्कृष्ट खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. ३० किलो वजनावरील गटात झालेल्या या स्पर्धेत तीव्र स्पर्धा आणि कडव्या सामन्यांमध्ये रोणालने दाखवलेली जिद्द, कौशल्य आणि अचूक तंत्र यामुळे त्याने रौप्यपदकाची कमाई करत पनवेल तालुक्याचा मान उंचावला.रोणालची मेहनत, चिकाटी आणि क्रीडाप्रती असलेली निष्ठा प्रेरणादायी आहे. राष्ट्रीय पातळीवर मिळवलेले यश पनवेलसाठी अभिमानाची बाब ठरली आहे. या कामगिरीबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी रोणालच्या कामगिरीचे कौतुक करून त्याला पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक आरक्षणावरील सुनावणी मंगळवारी !

## सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी पुढे ढकलली

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

नवी दिल्लीः महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये काही नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांमध्ये ५० टक्कपेक्षा अधिक आरक्षण आहे. याला सर्वोच्च न्यायालयात आदान देण्यात आले होते. यावर १७ नोव्हेंबरच्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली होती. आज यावर पुन्हा सुनावणी होणार होती. मात्र, न्यायमूर्ती जॉयमाल्या डागची उपस्थित नसल्याने सुनावणी आता मंगळवार, २५ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

राज्य सरकारने कोर्टाला सांगितले की, महापालिका निवडणुकांची घोषणा अद्याप झालेली नाही, कारण आरक्षण निकष आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक आहे.

न्यायालयाने स्पष्ट केले की, ही बाब निवडणूक प्रक्रियेशी थेट संबंधित आहे, त्यामुळे सर्व तथ्ये समोर ठेवून निर्णय घ्यावा लागेल. ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण लागू केल्याचा आरोप अद्याप प्रलंबित असून कोर्ट या मुद्द्याकडे गांभीयनि पाहत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये इतर मागासवर्गीयांसाठी (ओबीसी) सरसकट २७ टक्के आरक्षण लागू केल्याने आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ही १७ जिल्हा परिषदा, ८३ पंचायत समित्या, दोन महानगरपालिका आणि नगरपालिका नगरपंचायती अशा १५९ स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ओलांडली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी इतर मागास प्रवर्गासाठी (ओबीसी) सरसकट २७ टक्के आरक्षण लागू करण्यास निर्णय करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयात न्या. सूर्यकांत आणि न्या. जॉयमल्ल्या बागची यांच्या खंडपीठाने नापसंती व्यक्त केली होती. ५० टक्क्यापेक्षा अधिक आरक्षण राज्य निवडणूक आयोगाने नगरपालिका नगरपंचायत निवडणुकीसाठी आरक्षण सोडतीबाबत स्पष्ट सूचना दिल्या असताना काही ठिकाणी ५० टक्क्यापक्षा अधिका आरक्षणामुळे गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. आदिवासीबहुल स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

# बिबट्याच्या मुक्त संचाराने शेतकरी भयभीत रानडुकरांच्या उत्पातामुळेही हैराण





**दैनिक युवक**
**बाळासाहेब रकटाटे**
**आष्टी प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील सावरगाव, घाटापिंपरी, हारेवाडी, मराठवाडी, चिचोंडी, अंभोरा, वाघळूज आणि सुलेमान देवळा या परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याच्या वारंवार दर्शनामुळे शेतकरी प्रचंड भयभीत झाले आहेत. सध्या पिकांना पाणी देण्याचा हंगाम सुरु असून शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी शेतात जावे लागत आहे. मात्र बिबट्याच्या भीतीमुळे ते अक्षरशः जीव मोठे करून काम करत आहेत.

सोशल मीडियावर बिबट्या दिसल्याचे व्हिडिओ आणि मेसेज व्हायरल होत असल्याने भीतीचे वातावरण अधिकच गडद झाले आहे. दोन दिवसांपूर्वी घाटा पिंपरी –सावरगाव– मायंबा परिसरातील बिबट्याचा व्हिडिओ व्हायरल झाला. यापूर्वी सुलेमान देवळा परिसरातही बिबट्या ठाण मांडून बसल्याचे दिसून आले होते. वाघळूज परिसरातील प्रवाशांनीही काही दिवसांपूर्वी बिबट्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला होता. तर हरेवाडी येथेही बिबट्याचा फोटो व्हॉट्सॲपवर फिरताना दिसला.

रानडुक्करांच्या टोळयांचा उच्छाद

एकीकडे बिबट्याची भीती तर दुसरीकडे रानडुक्करांच्या टोळयांचा उच्छाद सुरूच आहे. रात्रीच्या वेळी रानडुक्करांच्या मोठ्या टोळ्या फिरताना दिसत असून ते पेरलेल्या पिकांची मोठ्या प्रमाणात नासाडी करत आहेत.

याहून भयंकर म्हणजे—

शेतात खायला काही मिळेनासे झाले तर रानडुक्कर आता गावातही घुसू लागले आहेत.

गावातील महिलांनी फेकलेले खरकटे, शिळे अन्न हे रानडुक्कर बिनधास्तपणे खाण्यासाठी रात्री गावात फिरताना दिसत आहेत.

पूर्वी रानडुक्कर लपून फिरायचे, पण आता ते उघडपणे वावरू लागले आहेत, हे अधिक चिंताजनक असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.शेतकरी झाले हैराण — संकटे संपायचे नाव नाही

अत्यंत मुसळधार पावसामुळे नुकत्याच आलेल्या नैसर्गिक संकटातून शेतकरी सावरत असतानाच बिबट्या व रानडुक्करांच्या त्रासाने त्यांचे हाल आणखी बिकट झाले आहेत.

"आसमानी आणि सुलतानी संकटाचा अक्षरशः डोंगर कोसळतोय," अशी प्रतिक्रिया अनेक शेतकऱ्यांनी दिली.

शेतकऱ्यांची मागणी : तातडीने बंदोबस्त करावा

या परिसरात बिबट्या वारंवार दिसत असल्याने वनविभागाने तातडीने योग्य बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होऊ लागली आहे.

त्याचप्रमाणे रानडुक्करांच्या वाढत्या त्रासावरही उपाययोजना करून शेतकरी आणि गावकऱ्यांचा बचाव करावा, अशीही जोरदार मागणी होत आहे.















## बोथली च्या सुनेचा पुण्यात साहित्य दरबारात सन्मान

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

भंडारा -मोहाडी तालुक्यातील बोथली या छोटास्या गावातील रहिवासी भारती तितीरमारे यांना दिनांक 16 नोव्हेंबर ला पुणे येतील क्रांतीज्योती सावित्री बाई फुले सभागृहात शिंधु ताई सपकाळ आदर्श साहित्यिका म्हणून गौरविण्यात आले. कथा कादंबरी नाटक कविता लेखना द्वारे त्यांनी केलेल्या जनजागृती कार्या साठी हा पुरस्कार आहे. श्रपित कस्तुरी ढसाललेली भिंत कथा संग्रहाच्यामाध्यमातून स्त्री मुक्तीची चळवळ उभारण्याचे कार्य त्यांनी केल. भारती तितीरमारे बोथली येतील माजी सरपंच कैलास तितीरमारे यांच्या पत्नी आहेत.वडील ह. भ. श्री. चक्रधर रेहपाडे महाराज यांची शिकवण यांच्या जीवनात मोलाची ठरली. या खेडे गावात राहून सुद्धा आपले छन्द आणि कौशल्य जोपसावेत असा संदेश सौ भारती कैलास तितीरमारे यांनी आपल्या सारख्या असंख्य गृहिणीनां दिला यांनी केलेल्या कार्या बद्दल परिसरातुन शुभेच्छा चा वर्षाव होत आहे.




## महाविकास आघाडीच्या कार्यालयाचे बालाराम पाटील यांच्या हस्ते दिमाखदार उद्घाटन : विकास, संवाद आणि लोकभावनांच्या नव्या प्रवासाची सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**सायली साळुंके,**
**उरण प्रतिनिधी व कार्यालय प्रमुख**

नवी उमेद, नवे ध्येय आणि जनतेच्या सेवेसाठी नव्या मार्गाची चाहूल देणारा महत्त्वाचा दिवस—महाविकास आघाडीच्या घटक पक्षाच्या कार्यालयाचे उद्घाटन आज मोठ्या उत्साहात आणि लोकांच्या उपस्थितीत पार पडले. परिसरातील कार्यकर्त्यांची रौनक, नागरिकांचा सहभाग आणि पदाधिकाऱ्यांची उपस्थिती यांत पारंपरिक मंगल शुभेच्छांच्या स्वरासह कार्यालयाचा शुभारंभ बालाराम पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

हा क्षण भविष्यातील राजकीय दिशा आणि लोकहिताच्या बांधिलकीचे प्रतीक ठरत, उपस्थितांच्या मनात नव्या आशावादाची एक कोवळी ज्योत पेटवून गेला.

उद्घाटनानंतर बालाराम पाटील यांनी थोडक्यात, परंतु मनात घर करणारे विचार व्यक्त केले. लोकांचा विश्वास जपणे, जनतेच्या प्रश्नांवर तत्पर प्रतिसाद देणे आणि विकासकामात पारदर्शकता ठेवणे—या तत्त्वांवर पक्ष दृढ राहील, असे त्यांनी ठामपणे सांगितले. समाजातील सर्व घटकांना जोडून घेणाऱ्या संवादाची गरज त्यांनी विशेष अधोरेखित केली.

यानंतर ओंकार घरत यांच्यासोबत झालेल्या चर्चेत जनहिताच्या काही महत्त्वाच्या कल्पना उजागर झाल्या.

"जर निवडून आलो तर महिलांची सुरक्षा हे माझे पहिले प्राधान्य असेल," असे त्यांचे ठाम वचन लोकांच्या मनात विश्वासाची नवी अंकुरं रोवून गेले. महिलांसाठी सुरक्षित वातावरण, सार्वजनिक वॉशरूमची उभारणी व सुधारणा, तसेच नागरिकांच्या भावनिक नाळेशी जुळलेल्या विमल तलावाच्या स्वच्छता मोहिमेवर त्यांनी विशेष भर दिला.

तलावाबद्दल बोलताना ते म्हणाले,

"विमल तलाव हा केवळ जलसाठा नाही, तर आपल्या संस्कृतीचा, भावनांचा आणि परंपरेचा सजीव ठेवा आहे. त्याला नवजीवन देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे."

आणि या ओळींनी उपस्थितांच्या मनात उत्साहाची लाट उठली—टाळ्यांचा गजर जणू त्यांच्या मनातल्या आशांना शब्द मिळाल्याचे खूण ठरला.

कार्यक्रमास उपस्थित असलेल्या नागरिकांच्या चेहऱ्यावर बदलाची उजळ अपेक्षा आणि विकासाच्या नव्या पर्वाची ओढ स्पष्ट जाणवत होती. पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी कार्यालयाच्या माध्यमातून अधिक जवळचा संवाद, त्वरित प्रतिसाद आणि जनतेशी स्नेहपूर्ण नातं जोडण्याचा संकल्प व्यक्त केला.




या नव्या कार्यालयातून पुढील काळात लोकसेवा, विकासाचा वेग आणि नागरिकांच्या प्रश्नांची परिणामकारक हाताळणी अधिक प्रभावी होईल, अशी सर्वांनी आशादायी भावना व्यक्त केली. उद्घाटन सोहळ्याने स्थानिक राजकीय वातावरणात नव्या ऊर्जेचा आणि सकारात्मकतेचा शीतल सुगंध फुलवला.

## नमस्कार : मानवी नात्यांना जोडणारी सामाजिक शक्ती

**- डॉ. राजेंद्र बगाटे**

'नमस्कार' हा शब्द उच्चारताच मनात एक उबदार भावना निर्माण होते. समोरच्या व्यक्तीला मान देणे, त्याच्याशी संवादाची पहिली पायरी टाकणे, आणि सामाजिक नात्यांची विण घट्ट करण्याची प्रक्रिया याची सुरुवात या छोट्याशा शब्दातून होते. म्हणूनच २१ नोव्हेंबर हा दिवस 'जागतिक नमस्कार दिन' (World Hello Day) म्हणून जगभर पाळला जातो. 1973 मध्ये इजिप्त आणि इस्त्रायल दरम्यान झालेल्या युद्धानंतर शांततेचा संदेश देण्यासाठी या दिवसाची निर्मिती झाली. आज जवळजवळ 180 हून अधिक देश हा दिवस पाळतात. नमस्कार हा केवळ अभिवादनाचा शब्द नाही; तो सामाजिक व्यवहारातील सभ्यता, नम्रता आणि परस्पर आदराचे प्रतिक आहे. समाजशास्त्राच्या दृष्टीने पाहिल्यास 'नमस्कार' म्हणजे मानवसंस्कृतीचा मूलभूत पाया होय. मानवी संबंध, सामाजिक भांडवल (social capital), सांस्कृतिक मूल्ये आणि शांततामय सहजीवनाची तत्त्वे यांची सांगड 'नमस्कार' या एका छोट्याशा कृतीतून दिसून येते.

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात, संवादाच्या असंख्य साधनांची उपलब्धता असली तरी मानवी नात्यांतील उब, आदर आणि संवेदनशीलतेचे स्थान धोक्यात येताना दिसते. व्हर्च्युअल संवाद वाढल्याने 'हॅलो', 'हाय' अशी इंग्रजी स्वरूपातील अभिवादने प्रचलित झाली, परंतु भारतीय 'नमस्कार' या संकल्पनेतील सांस्कृतिक खोली आजही अधिक प्रभावी आहे. भारतीय समाजात अभिवादन हा एक संस्कार मानला जातो. वडीलधाऱ्यांना वंदन करणे, पाहुण्यांचे स्वागत करणे, रस्त्यावर भेटलेल्या व्यक्तीला नम्रपणे 'नमस्कार' म्हणणे ही कृती मनातील आदर जागवते. एखाद्या व्यक्तीला केलेला नमस्कार म्हणजे त्याच्या अस्तित्वाची पावती होय. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता 'नमस्कार' ही सामाजिक सलोखा, स्नेहभाव, समुदायभावना आणि नागरिकांमधील विश्वास वाढवणारी कृती आहे.

आजचा काळ तंत्रज्ञानाने अवकाश कवेत घेतलेला काळ आहे. पण त्याच वेळी व्यक्तिगत एकाकीपण, तणाव, भीती, मानसिक आरोग्याशी संबंधित संकटे वाढत आहेत. मानसशास्त्र सांगते की सर्वात छोटा सामाजिक संकेत जसे की स्मित, अभिवादन, नमस्कार ही कृती व्यक्तीला सामाजिक अस्तित्वाची जाण करून देते, आत्मविश्वास वाढवते आणि सकारात्मक ऊर्जा देते. म्हणून 'नमस्कार' ही संस्कृती केवळ आदराची खूण नसून मानसिक आरोग्याच्या दृष्टीनेही महत्त्वाची आहे. एखाद्या



अनोळखी व्यक्तीलाही नमस्कार केल्यावर तो क्षण एक प्रकारची सुरक्षितता निर्माण करतो. अनोळखी लोकांमधील संवादाची सुरुवात तणाव कमी करते आणि सामाजिक विश्वास वाढवते. म्हणूनच सार्वजनिक ठिकाणी, शाळा-कॉलेजमध्ये, शासकीय कार्यालयांत किंवा गावपातळीवरील सामूहिक जगामध्ये अभिवादन संस्कृती वाढवणे म्हणजे सामाजिक सकारात्मकतेचा पाया मजबूत करणे होय.

समाजशास्त्रामध्ये अभिवादनाला 'प्रतीकात्मक आंतरक्रीयावाद' (Symbolic Interactionism) याच्या मुळाशी सामावलेले मानले जाते. प्रत्येक व्यक्ती स्वतःबद्दल आणि इतरांबद्दलची धारणा निर्माण करताना या प्रतीकात्मक कृतींचा आधार घेतो. 'नमस्कार' हा केवळ हात जोडणे किंवा शब्द उच्चारणे नाही; तो आपल्या संस्कारांचे, मूल्यांचे आणि सामाजिक ओळखीचे प्रतीक आहे. एका व्यक्तीचा नमस्कार दुसऱ्यात आदर, स्वीकार आणि सुरक्षिततेची भावना निर्माण करतो. यामुळे सामाजिक नातेसंबंध दृढ होतात. परिणामी समाजातील तणाव घटतो, स्पर्धा आणि संघर्षाच्या वातावरणात मानवी संवेदना टिकून राहतात.

जागतिक नमस्कार दिनाचा मुख्य संदेश हा जगातील शांतता, सौहार्द, संवाद आणि सामोपचार टिकवण्याचा आहे. आज जेव्हा देशांमध्ये राजकीय तणाव, सांस्कृतिक संघर्ष, धार्मिक मतभेद, हिंसा आणि डिजिटल दरी वाढत आहे, तेव्हा 'हॅलो' किंवा 'नमस्कार' हा शब्द छोटा असला तरी त्यामागील विचार मोठा आहे, तो म्हणजे संवादाद्वारे तणाव कमी करणं. इतिहास सांगतो की युद्ध, संघर्ष आणि कटुता हे गैरसमजातून वाढतात. संवादाची पहिली पायरी म्हणजे अभिवादन होय. त्यामुळे जागतिक नमस्कार दिन हा शांततेच्या प्रक्रियेतील एक प्रतीकात्मक पाऊल आहे.

भारतीय समाजात 'नमस्कार' दिन साजरा करण्याचे सामाजिक महत्त्व अधिक व्यापक आहे. नमस्कार म्हणजे संस्कृती टिकवण्याचा मार्ग आणि सामाजिक भांडवल वाढवण्याचे साधन आहे. आधीच्या पिढ्या सकाळी उठल्याक्षणी घरातील ज्येष्ठांना नमस्कार करून दिवसाची सुरुवात करायच्या. आजच्या पिढीत हे बंधन शिथिल झाले, परंतु अभिवादन संस्कृतीचे मूल्य आज अधिकाधिक महत्त्वाचे आहे. समाज माध्यमांवरील आभासी जगात 'हाय', 'हॅलो', 'गुड मॉर्निंग'चे संदेश हजारो मिळतात, पण प्रत्यक्ष आयुष्यातील नमस्कार देणारा जवळचा माणूस नसल्यास त्या संबंधांचा उबदारपणा टिकत नाही.

याच अनुषंगाने, या दिवशी शाळा-महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना अभिवादनाचे महत्त्व शिकवणे आवश्यक आहे. वर्गात प्रवेश करताना शिक्षकाला नमस्कार करणे, मित्रांना अभिवादन करणे, एकमेकांचा आदर राखणे, ही छोटी कृती मुलांमध्ये सामाजिक कौशल्ये विकसित करते. आजची युवा पिढी तंत्रज्ञानात प्रचंड वेगाने प्रगती करत असली तरी सामाजिक कौशल्यांमध्ये घट जाणवते. मूलभूत संवादकौशल्य, सौजन्य, विनम्रता व परस्पर आदर या मूल्यांत सातत्य ठेवणे आवश्यक आहे. नमस्कार हा केवळ परंपरा नाही, तर सामाजिक भावनिक शिक्षणाचा मूलाधार आहे.

याहूनही महत्त्वाचे म्हणजे विविधतेने नटलेल्या भारतीय समाजात 'नमस्कार' ही कृती सर्वांना जोडणारा पूल आहे. भाषा, धर्म, जात, प्रदेश, वंश, आर्थिक विभाजन या सर्व भिंतींच्या पलीकडे 'नमस्कार' हा समान संस्कार आहे. महामार्गावर भेटलेला ट्रकचालक असो, सायकलवर जाणारा शेतकरी असो, उंच इमारतीत राहणारा व्यावसायिक असो किंवा गावातील वृद्ध महिला-पुरुष असो 'नमस्कार' हा शब्द सर्वांना सारखाच उबदार वाटतो. सामाजिक समता आणि परस्पर आदर टिकवण्यास ही कृती महत्त्वाची ठरते.

आजच्या काळात संवादाच्या तुटलेल्या धाग्यांची जुळवाजुळव करणे ही मोठी गरज आहे. कुटुंबांमध्ये पिढ्यांमधील संवाद कमी झाला आहे, समाजात परस्पर अविश्वास वाढतो आहे, सार्वजनिक क्षेत्रात चिडचिड, आक्रमकता आणि असहिष्णुता वाढत आहे. पण या नकारात्मकतेत 'नमस्कार' हा छोटासा शब्द मनातला राग विरघळवतो, नव्या संवादाचे दार उघडतो आणि सामाजिक उबदारपणा निर्माण करतो. मानसशास्त्रीयदृष्ट्या नमस्कार केल्याने हसरा चेहरा आणि नम्र आवाज मेंदूतील सकारात्मक हार्मोन्स सक्रिय करतात. त्यामुळे व्यक्तीचा मूड सुधारतो, तणाव कमी होतो आणि नात्यांमध्ये सौम्यता वाढते.

जागतिक नमस्कार दिन हा केवळ औपचारिक दिन नाही; तो सामाजिक संवेदना, मानवता आणि परस्पर आदराचा उत्सव आहे. वाईट बातम्यांनी भरलेल्या जगात चांगल्या संवादाची, सकारात्मक सामाजिक वर्तणुकीची आणि मानवी मूल्यांची गरज पूर्वीपेक्षा अधिक आहे. खरा संवाद 'नमस्कार'पासूनच सुरू होतो. एखाद्या छोट्या अभिवादनानेही आपण एखाद्याच्या मनात आशेचा दिवा पेटवू शकतो.

आज या दिवसाचे औचित्य साधून आपण आपल्या जीवनात खालील विचार दृढ करणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीला मान द्या, कोणालाही भेटताना अभिवादन करण्याची संस्कृती रुजवा, नात्यांमध्ये संवादाची दारे सतत उघडी ठेवा आणि समाजात सकारात्मकतेचा संदेश पसरवा. जागतिक नमस्कार दिन आपल्याला स्मरण करून देतो की मोठा बदल करण्यासाठी मोठी भाषणे किंवा मोठी कृती आवश्यक नसते; कधी कधी एका साध्या 'नमस्कार'मध्येही मानवतेचे सर्वात मोठे सामर्थ्य दडलेले असते.

म्हणूनच आजच्या या जागतिक नमस्कार दिनी आपण सर्वांनी एकच संकल्प करूया की प्रत्येक दिवशी भेटलेल्या प्रत्येक व्यक्तींना मनापासून अभिवादन करायचे. 'नमस्कार' या शब्दात सामाजिक बंधुभावाचे, संस्कारांचे आणि शांततेचे बीज आहे. या बीजातूनच मानवतेचा वटवृक्ष उभा राहतो. नमस्कार म्हणजे फक्त अभिवादन नाही; तो मनुष्यत्वाचा उत्सव आहे.

**Best Opportunity For**

- House Wife
- Retired
- Teacher
- Businessman



- We are fastest growing organization
- Work Fulltime or Part time as per your requirement
- No Target, No Investment
- Reward & Recognition
- Opportunity For Domestic & International Trip

Hurry Up Limited Seats

Provident Fund + Medical Benefits
Education: 12th pass to Graduates
Entry Age: 30 years to 65 years

Earn Fixed salary upto Rs.30,000/- & incentives upto 2 lakhs p.m.

Gauri gaikwad:8898632067

## बँकेचे स्थानांतरण तात्काळ रद्द करा 18 गावातील जनतेचा एल्गार

### विर्शीत बसले बँक ऑफ महाराष्ट्र समोर आमरण उपोषणावर ; साकोली पोलीसांचा बंदोबस्त

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

भंडारा -४० वर्षांपासून स्थायी असलेल्या विर्शी येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेचे स्थानांतर २१ नोव्हेंबरला साकोलीत होत आहे. याविरोधात विर्शी आणि १८ गावातील सरपंच उपसरपंच यांसह बचत गटातील महिला पुरुष जनतेने हे स्थानांतरण तात्काळ रद्द करा यासाठी ( गुरू. २० नोव्हें.) ला विर्शी शाखेसमोरच आमरण उपोषणाला सुरुवात केली. ही मागणी पूर्ण न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा सुद्धा दिला आहे. येथे साकोली पोलीसांनी चोख पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. या शाखेत परीसरातील सुमारे ५ हजारांवर शेतकरी, महिला पुरुष व विद्यार्थ्यांचे खाते असून याला सर्व जनतेनी विरोध दर्शविला आहे.

विर्शी येथे ४० वर्षांपासून बँक ऑफ महाराष्ट्र शाखा सुरू आहे. येथे एकुण ५ हजारांवर खातेधारक आहेत. यामध्ये परीसरातील उकारा, मोखे, सितेपार, किन्ही, मोखे, रेंगेपार, खांबा, जांभळी, मालुटोला, वडेगाव, सातलवाडा, चारगांव, सुंदरी यांसह अनेक गावांतील महिला पुरुष, विद्यार्थी, शेतकरी आणि विद्यार्थ्यांचे खाते आहेत. सदर शाखेचे स्थानांतरण साकोली येथे होत आहे. परंतू याचा त्रास असंख्य जनतेला व अपंग व्यक्तींना होणार आहे. करीता हे स्थानांतरण तात्काळ रद्द करा यासाठी अनेक गावांतील शेतकरी, सरपंच, उपसरपंच, महिला बचत गटातील असंख्य महिला आणि जनता बॅंकेसमोरच आमरण उपोषणाला बसले आहेत. यांची मागणी हिच आहे की, समस्त जनतेची भयंकर गैरसोय आणि वारंवार साकोलीला हेलपाट्या होऊ नये म्हणून ही शाखा येथेच ठेवून हे स्थानांतरण तात्काळ रद्द करा. अन्यथा विर्शी येथेच रस्त्यावर उतरून जनआंदोलन छेडण्याचा इशारा याप्रसंगी देण्यात आला. या बँकेत या १८ गावातील सुमारे ५ हजारांहून अधिक खातेदार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे. हे गुरूवारी आमरण उपोषण सुरू होताच साकोली पोलीस निरीक्षक महादेव आचरेकर यांनी तात्काळ विर्शी येथे पोलीस बल पाठवून बंदोबस्त तैनात केलेला आहे. तर नागपूरहून बँक ऑफ महाराष्ट्रचे वरिष्ठ अधिकारी सुद्धा विर्शीत आले आहेत.

बँक ऑफ महाराष्ट्र विर्शी शाखेचे स्थानांतरण तात्काळ रद्द करा, या आमरण उपोषणाला जि. प. सभापती शितल राऊत, ओमकार कापगते, सरपंच विर्शी लिलाधर सोनवाने, किन्ही सरपंच घनश्याम पारधी, सरपंचा मोखे केमेश्वरी टेंभरे, दुर्गेश राऊत, सरपंचा सातलवाडा अर्चना मेश्राम, सरपंच चारगांव मोहन लंजे, ग्रामपंचायत सदस्य सर्व ( विविध गाव ) रजनी राऊत, उपराज बोपचे, भगवान लांजेवार, सरीता गहाणे, बचत गट महिलावर्ग छाया लंजे, खोकेश्वरी कापगते, शेतकरी होमराज कापगते, जयेश इलमकार, यशवंत लांजेवार, पतिराम ठाकरे, गोपिनाथ कापगते, वकटू लांजेवार यांसह १८ गावातील सुमारे दोनशेच्या वर जनता आमरण उपोषणावर बसलेले आहेत.




"ही बॅंक येथून गेली तर माझ्यासारख्या डोळ्यांनी अंध वृद्धा मी कुठे जाणार. माझे मोतिबिंदू ऑपरेशन झाले आहे माझ्या सोबतच्या असंख्य महिलांनी कसे करायचे, म्हणून आम्ही सुद्धा या उपोषणाला बसले आहोत"

**-- निर्मलाबाई नानू टेंभूर्णे**
**वृद्ध अपंग महिला**

"या विर्शी परीसरातील १८ गावातील जनतेच्या हितासाठी व वारंवार साकोलीला येरझारा टाळण्यासाठी या बॅंकेचे स्थानांतरण थांबवा अन्यथा समस्त जनतेला धरून जन आंदोलन उभारले जाईल, याची नोंद घ्यावी"

**-- शितल जयेश राऊत**
**जिल्हा परिषद सभापती भंडारा, रहिवासी - विर्शी**

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# एखाद्या व्यक्तीला स्पर्श केल्यास कधी-कधी शॉक का लागतो?

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे**
**विदर्भ प्रमुख**

जर तुम्हाला वारंवार विजेचा धक्का बसत असेल , जर तुम्हालाही तुमच्या घरात, ऑफिसमध्ये किंवा तुम्ही जिथे काम करता तिथे हा विजेचा झटका जाणवत असेल, तर हे सगळं काय आहे, यासाठी आपल्याला थोडेसे विज्ञान समजून घ्यावे लागेल, आपण कशापासून बनलेलो आहोत याबद्दल थोडेसे जाणून घ्यावे लागेल. जर तुम्हाला हे समजले तर तुम्हाला हे सर्व समजेल.

ज्याप्रमाणे तुम्ही घर बांधता तेव्हा त्याच्या भिंती आणि संपूर्ण घर लहान विटांनी बनलेले असते, त्याचप्रमाणे आपले शरीर किंवा जगातील प्रत्येक वस्तू, पदार्थ अणूंनी बनलेला असतो. अणू(atom)हा कोणत्याही पदार्थाचा सर्वात लहान कण असतो आणि सर्व घटक अणूंनी बनलेले असतात, मग ते घन असो, द्रव असो किंवा वायू असो, सर्वकाही अणूंनी बनलेले असते. आपणही त्याचाच एक भाग आहोत, म्हणजेच अणू हा आपल्या रचनेचा मूलभूत घटक आहे. या अणूमध्ये प्रोटॉन, न्यूट्रॉन आणि इलेक्ट्रॉन असतात. इलेक्ट्रॉन केंद्रकाभोवती फिरतात. इलेक्ट्रॉन हा कोणत्याही अणूचा सर्वात लहान भाग असतो, तर या इलेक्ट्रॉनवर ऋण भार( negative charge) असतो, हा भार म्हणजे एक प्रकारची ऊर्जा असते जी सर्व पदार्थांमध्ये असते, हा भार हा कोणत्याही पदार्थाचा मूलभूत गुणधर्म असतो. हे भार दोन प्रकारचे असतात, एक धन आणि एक ऋण असतो. आता या दोघांमध्ये एक आकर्षण देखील आहे, जसे की धन आणि धन, तर ते एकमेकांना दूर ढकलतात, जसे तुम्ही चुंबकांमध्ये पाहिले असेल. आणि जर विरुद्ध भार एकमेकांजवळ आले तर ते एकमेकांना आकर्षित करतात. ही भौतिकशास्त्राची एक अतिशय मूलभूत गोष्ट आहे.( Law of Conservation of energy) हे भार निर्माण करता येत नाही आणि नष्टही करता येत नाही. आपण ऊर्जा निर्माण करू शकत नाही किंवा नष्ट करू शकत नाही. आपण ते एका वस्तूवरून दुसऱ्या वस्तूमध्ये स्थानांतरित करू शकतो. आणि हस्तांतरणाच्या या घटनेला आपण स्थिर प्रकाश म्हणतो. म्हणून, जेव्हा हे पदार्थ एकमेकांना हस्तांतरित केले जातात, मग तिथे स्थिर प्रकाश जन्माला येतो.

स्थिर वीज किंवा स्टॅटिक करंट (static current)म्हणजे एका ठिकाणी स्थिर असलेला विद्युत भार. आणि यानुसार, जेव्हा दोन वस्तू एकमेकांवर घासल्या जातात, तेव्हा त्यांमधील इलेक्ट्रॉन एका वस्तूवरून दुसऱ्या वस्तूपर्यंत जातात. या प्रक्रियेमुळे एका वस्तूत विद्युतभार निर्माण होतो, जो एका जागी स्थिर राहतो. यालाच स्थिर वीज म्हणतात.

ही स्थिर वीज आपल्याला स्थिर प्रकाश म्हणून अनुभवायला डोळ्याने दिसते . हा स्थिर प्रकाश ही एक अशी घटना आहे जी आपल्याला अनेकदा जाणवते, विशेषतः जेव्हा हवामान कोरडे असते. हे एखाद्या वस्तूच्या पृष्ठभागावरील विद्युत भाराचे ( charge) संतुलन आहे. ही संतुलन निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. आणि इथे स्थिर म्हणजे स्थिर, थांबलेला किंवा गतिहीन. जसे तुमच्या घरातील प्रकाश तुमच्या तारांमध्ये वाहत असतो, जर तुम्ही तारेला स्पर्श केला तर तो एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाईल, परंतु स्थिर प्रकाश एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी अशा प्रकारे जात नाही; ते एकाच ठिकाणी थांबलेले राहते. म्हणूनच आपण त्याला स्थिर प्रवाह म्हणतो. आणि जेव्हा आपण कोणत्याही गोष्टीला स्पर्श करतो तेव्हा ते जाणवते, जसे की जेव्हा आपण आपल्या मित्राशी हस्तांदोलन करतो तेव्हा, त्या परिस्थितीत या विजेचा धक्का जाणवतो. ते जाणवते आणि हा अनुभव आपल्या जीवनाचा एक भाग बनला आहे, विशेषतः काही विशिष्ट परिस्थितीत, आपण तो नेहमीच अनुभवत राहतो. आता, हा स्थिर प्रकाश कसा तयार होतो, तो कसा निर्माण होतो? तर याचे एक मुख्य कारण म्हणजे जेव्हा दोन गोष्टी एकमेकांवर घासतात, अशा प्रकारे संपर्कात येतात, तेव्हा त्या एकतर एकमेकांच्या संपर्कात येतात किंवा घासल्यानंतर एकमेकांपासून वेगळे होतात. या दोन्ही परिस्थितींमध्ये एक भार ( charge) निर्माण होतो जो त्यांच्यामध्ये हस्तांतरित होतो आणि हेच याचे मुख्य कारण आहे. जेव्हा तुम्ही कोरड्या वातावरणात चालता तेव्हा तुमच्या शरीरात इलेक्ट्रॉन जमा होतातआणि जेव्हा तुम्ही कोणत्याही धातूला किंवा कोणत्याही व्यक्तीला स्पर्श करता तेव्हा जेव्हा ते संपर्कात येतात तेव्हा हे इलेक्ट्रॉन वेगाने हस्तांतरित होतात आणि जेव्हा हे हस्तांतरित होतात तेव्हा तुम्हाला सौम्य विद्युत धक्का (shock) बसतो . आता हे तुमच्या मानवी शरीरात कसे तयार होतात आणि जेव्हा आपण हस्तांदोलन करतो तेव्हा हे कसे हस्तांतरित होतात त्याला ट्रायबोलेक्टिक प्रभाव म्हणतात.

ट्रायबोलेक्टिक इफेक्ट ट्रायबोलेक्टिक इफेक्ट हा एक विशेष प्रकारचा स्थिर प्रवाह आहे आणि जेव्हा दोन भिन्न पदार्थ एकमेकांशी घासले जातात किंवा तुम्ही बसता किंवा उठता, जेव्हा तुम्ही तुमच्या सोफ्यावर बसता किंवा कार्पेटवर चालता तेव्हा त्यांच्यामध्ये घर्षण निर्माण होते किंवा ते एकमेकांवर घासले जातात तेव्हा ते निर्माण होते. आता यामध्ये काय होते की वेगवेगळ्या प्रकारचे विद्युत प्रवाह एकमेकांमध्ये मिसळतात. इलेक्ट्रॉन हे हालचाल करतात. किंवा ते हस्तांतरित होतात, समजा एका पदार्थाच्या आत एक धन भार तयार होतो आणि दुसऱ्या पदार्थाच्या आत एक ऋण भार तयार होतो, आणि जेव्हा हे हस्तांतरण होते, तेव्हा तेथे स्थिर प्रवाह तयार होईल. याचे उत्तम उदाहरण , हिवाळ्यात, जेव्हा लहान मुले त्यांचे स्वेटर काढतात तेव्हा त्यांचे केस उभे राहतात. अंधाऱ्या खोलीत, जेव्हा तुम्ही असे स्वेटर काढता तेव्हा तुम्हाला हलक्या ठिणग्या देखील दिसू शकतात. जेव्हा तुम्ही स्वतःला ब्लँकेटने झाकता तेव्हाही अशा ठिणग्या येतात. आजकाल उपलब्ध असलेल्या फर ब्लँकेटने तुम्ही स्वतःला झाकले तरी तुम्हाला तिथे प्रवाह दिसेल. तुमचा कंगवा प्लास्टिकचा बनलेला असतो किंवा शाळेत अनेक मुले असे खेळ खेळतात की ते प्लास्टिकची स्केल घेतात, ती केसांवर घासतात आणि नंतर त्यापासून कागदाचे छोटे तुकडे ते त्यावर चिकटतात. हे स्थिर प्रवाहामुळे घडते. जेव्हा तुम्ही कार्पेटवर चालता किंवा सोफ्यावर बसता तेव्हा शरीरात आणि सोफ्यात किंवा कार्पेटमध्ये घर्षण निर्माण होते, ज्यामुळे तुमचे शरीर देखील भारित होते आणि त्यामध्ये देखील स्थिर प्रवाह तयार होतो आणि जेव्हा तुम्ही इतर कोणत्याही गोष्टीला स्पर्श करता तेव्हा तो भार स्थानांतरीत होतो आणि त्यामुळे तुम्हाला धक्का बसतो. दुसरे उदाहरण म्हणजे तुम्ही एक फुगा फुगवून तो तुमच्या केसांवर घासता आणि तुम्ही तो तुमच्या केसांवर घासता तेव्हा त्याच्या आत एक ऋण भार तयार होतो आणि त्यानंतर तोच फुगा तुमचे केस आकर्षित करतो आणि तुमचे केस त्याकडे ओढले जातात. किंवा बरेच लोक फुगा उडवतात फक्त डोक्याने घासून भिंतीवर चिकटवतात . तिथेही हे ऋण आणि धन भार निर्माण होतो . कोरड्या हवामानात जेव्हा तुम्ही कृत्रिम कपडे घालता आणि ते एकमेकांवर घासता तेव्हा येथेही स्थिर प्रवाह निर्माण होतो आणि एकमेकांना स्पर्श केल्यावर किंवा अगदी एकमेकांना स्पर्श केल्यावर तुम्हाला विजेचे झटके येऊ शकतात. आता आपण हे समजून घेऊया की स्थिर प्रवाहामुळे तुमचे गंभीर नुकसान होऊ शकते. जर तुम्हाला वारंवार विजेचा धक्का बसत असेल, किंवा तुम्ही एखाद्या गेटला स्पर्श केला असेल किंवा एखाद्या व्यक्तीच्या संपर्कात आला असाल, तर यामुळे कोणतेही गंभीर नुकसान होत नाही, परंतु तुमचे केस सरळ उभे राहू शकतात. हे बहुतेकदा कोरड्या हवामानात घडते. तुम्हाला त्यात छोटे धक्के जाणवू शकतात.

कंगवा आणि केस: कंगवा केसांवर घासल्यास केस कंगव्याला आकर्षित करतात. वस्तू आणि शॉक: प्लास्टिकच्या वस्तू किंवा कपड्यांवर घर्षण केल्याने शॉक जाणवतो.वीज :

ढगांमधील घर्षणामुळे निर्माण होणारी वीज (lightning) हे स्थिर वीजेचेच एक रूप आहे.

**वीज पडणे म्हणजे काय?**

जेव्हा दोन ढग एकमेकांवर आदळतात तेव्हा विजेचा कडकडाट होतो. जेव्हा एका ढगाचा धन भार दुसऱ्या ढगाच्या धन भारावर आदळतो किंवा ऋण भार दुसऱ्या ढगाच्या ऋण भारा वर आढळतो, तेव्हाच वीज चमकते. जेव्हा ही आकाशीय वीज जमिनीवर पोहोचते, तेव्हा तिला 'वीज पडणे' असे म्हणतात.

**Static Current in Human Body :**

कदाचित तुमच्यासोबतही असे घडले असेल की जेव्हा तुम्ही एखाद्याला स्पर्श (Touch) केला असेल किंवा कोणीतरी तुम्हाला स्पर्श केला असेल तेव्हा तुम्हाला विजेचा झटका बसला असेल. कधीकधी दरवाजा, खुर्ची किंवा एखाद्या व्यक्तीला स्पर्श केल्यावर स्पार्कसारखा आवाज येतो आणि विजेचा धक्का बसतो. यानंतर त्या वस्तूला किंवा व्यक्तीला हात लावायलाही भीती वाटते. हिवाळ्यात असं बऱ्याचदा घडतं. हे तुमच्यासोबत नक्कीच कधी ना कधी घडलं असेल? पण असं घडण्यामागे नेमकं कारण काय आहे, याचा कधी विचार केला आहे का? यामागे एक वैज्ञानिक कारण लपलेलं आहे.

मज्जातंतूशी संबंधित याचं कारण आहे.

या प्रकारचा विजेचा धक्का थेट आपल्या शरीराच्या नसांशी संबंधित आहे. काही लोक या विजेच्या झटक्यांना खूप घाबरतात. पण याला घाबरण्याचं कारण नाही. ही एक अतिशय सोपी प्रक्रिया आहे. यामागचं कारण बी12, बी6 आणि बी1 या जीवनसत्त्वांची कमतरता असल्याचं डॉक्टर आणि तज्ज्ञांचं मत आहे. जर तुम्हाला असे विजेचे झटके सतत बसत असतील तर मात्र या संदर्भात तुम्ही डॉक्टरांचा सल्ला घेण्याची आवश्यकता आहे.

**अचानक विजेचा धक्का का बसतो?**

न्यूरोलॉजिस्टच्या मते, आपल्या शरीरात विद्युत क्रिया म्हणजेच इलेक्ट्रिकल ॲक्टिव्हिटी (Electrical Activity) सतत सुरु असते. घरांमध्ये ज्या प्रकारे इलेक्ट्रिक वायरचा वापर केला जातो आणि त्यामधील तांब्याच्या तारेवर प्लास्टिकचं कोटिंग म्हणजे आवरण असतं. त्याचप्रमाणे शरीरातील नसांवरही कोटिंग असतं, याला वैद्यकीय भाषेत मायलिन शीथ (My-elin Sheath) म्हणतात. कधीकधी हे मायलिन शीथ असंतुलित होतात. तुम्ही खूप वेळ एकाच स्थितीत राहता तेव्हा बहुतेकदा असं घडतं. त्यामुळे शरीरातील इलेक्ट्रॉन्स गडबडतात. या काळात अचानक एखाद्याला स्पर्श करताच मज्जातंतूंमधील मायलिन आवरण सक्रिय होतात. त्यामुळे स्पार्क होऊन विजेचा धक्का जाणवतो.

**शॉक कुणाला कमी, तर कुणाला करंट जास्त का जाणवतो?**

न्यूरोलॉजिस्टच्या मते, करंट लागणं हे प्रत्येक व्यक्तीच्या संवेदनशीलतेवर अवलंबून असतं. त्यामुळे काही लोकांना जास्त काही लोकांना कमी प्रमाणात करंट जाणवतो. ही सामान्य प्रक्रिया आहे. पण तुम्हाला असा करंट सतत बसत असतील तर मात्र डॉक्टरांचा सल्ला घेणं गरजेचं आहे.

**प्लास्टिकच्या खुर्चीचाही बसतो शॉक**

प्लास्टिकच्या खुर्चीवर बसताना जेव्हा आपले पाय जमिनीला स्पर्श करत नाहीत, त्यावेळी प्लास्टिकची खुर्ची आपल्या कपड्यांमधून इलेक्ट्रॉन गोळा करते आणि त्यात सकारात्मक भार जमा होतो. खुर्चीवर बसलेली व्यक्ती उठताच हा भार खुर्चीच्या दिशेने जातो आणि खुर्चीला स्पर्श केल्यावर विजेचा धक्का जाणवतो.

**कोपराला सर्वात जास्त शॉक का जाणवतो?**

शरीरात अशा प्रकारचा विजेचा झटका कोपराजवळ सर्वाधिक जाणवतो. आपल्या कोपराजवळ अल्नर नावाची नस असते. ही नस मणक्यापासून खांद्यावरून सरळ हातांच्या बोटांपर्यंत पोहोचते. कोपराच्या हाडाला झाकणाऱ्या या नसेला धक्का बसताच करंट लागतो. अल्नर नसेला स्पर्श होताच आपल्या शरीरातले न्यूट्रॉन आपल्या मेंदूला सिग्नल पाठवतात आणि त्यामुळे शॉक जाणवतो.

**5G रेडिएशनचा प्रवाह**

म्हणून बरेच लोक असा विश्वास करतात की हा प्रवाह 5G रेडिएशनचा परिणाम आहे, त्याला अजिबात स्पर्श न केल्याने जो प्रवाह जाणवत आहे तो 5G रेडिएशनचा आहे. कोणताही परिणाम होत नाही, ही एक मिथक आहे कारण 5G रेडिएशनमध्ये तुमच्या शरीरातील अणूंना आयनीकृत करण्यासाठी पुरेशी ऊर्जा नसते, म्हणून चार्ज होणे म्हणजे जर एखादा अणू त्याचा इलेक्ट्रॉन गमावतो, म्हणजेच तो स्थानांतरित करतो, तर तो सकारात्मक भार होतो आणि जर तो इलेक्ट्रॉन मिळवतो, तर तो नकारात्मक भार होतो आणि 5G रेडिएशनच्या संपर्कात आल्यावर असा कोणताही भार जमा होत नाही, म्हणून स्पर्श केल्यावर जाणवणारा विद्युत शॉक 5G रेडिएशनमुळे नसून इतर कारणांमुळे होतो. बरं, तुमच्यापैकी बरेच जण असा विचार करू इच्छितात की जर आपल्याला वारंवार विजेचे झटके येत असतील तर आपण ते कसे कमी करू शकतो? आपल्याला विजेचे झटके लागणार नाहीत असे वातावरण आपण कसे निर्माण करू शकतो? पहा, विजेचे झटके येण्याचे खरे कारण तुमच्या आजूबाजूचे वातावरण आहे. यावेळी वाहणाऱ्या वाऱ्यातील आर्द्रतेत घट यामुळे, तुमच्या खोलीतील ओलावा कमी होत आहे. यासाठी सर्वात चांगली गोष्ट म्हणजे तुम्ही तुमच्या घरात झाडे लावू शकता. झाडे तुमच्या घरात ओलावा खूप चांगल्या प्रकारे टिकवून ठेवतात. तुमच्या आजूबाजूला भरपूर झाडे लावा, तुमचे घर आपोआप ओलसर राहील. किंवा बाजारात उपलब्ध असलेल्या इम्युनिटी फायरमुळे, ज्यामधून पाण्याचा धूर बाहेर पडतो, त्यामुळे तुमच्या खोलीत ओलावाही राहू शकतो. जेव्हा तुम्ही नायलॉन किंवा पॉलिस्टरसारखे कृत्रिम कपडे घालता तेव्हा ते घालणे टाळा. बहुतेकदा सुती कपडे घालण्याचा प्रयत्न करा, सुती कपडे घाला कारण हे कृत्रिम कपडे स्थिर प्रवाह वाढवतात. ते घातल्याने स्थिर प्रवाह वाढतो. ते तुमच्या त्वचेला मॉइश्चरायझ देखील करते.

**हवेतील आर्द्रता पातळी**

तुमची त्वचा कोरडी होण्यापासून वाचवण्यासाठी तुम्ही मॉइश्चरायझर किंवा लोशन देखील वापरू शकता. जेव्हा तुम्हाला असे वाटते की तुम्ही असे कपडे घातल्यामुळे तुमच्या शरीरात स्थिर प्रवाह तयार होत आहे, तेव्हा कोणत्याही गोष्टीला स्पर्श करण्यापूर्वी, तुमच्या सभोवतालच्या कोणत्याही जमिनीला स्पर्श करा, तर स्थिर प्रवाह स्थानांतरित होईल. बहुतेक लोक, जर ते सोफा किंवा प्लास्टिकच्या खुर्चीवर शूज घालून बसले तर त्यांच्या शरीरात स्थिर प्रवाह तयार होतो. जर तुम्ही घरात अनवाणी राहिलात तर स्थिर प्रवाह तयार होणार नाही, तो प्रवाह शरीरातून थेट जमिनीवर हस्तांतरित होईल. म्हणूनच जुने लोक म्हणायचे की घरी असतानाही अनवाणी राहा, म्हणून बहुतेक लोक जे घरी बूट आणि चप्पल घालून राहतात त्यांना हा प्रवाह जास्त जाणवतो. आर्द्रता आग कशी वाचवू शकते

चला त्याबद्दल थोडे समजून घेऊया. घरातील हवेतील आर्द्रता पातळी ३० ते ५०% च्या दरम्यान असावी. जर ही पातळी सामान्यपेक्षा कमी किंवा जास्त असेल तर परिस्थिती वेगळी असू शकते. ३० ते ५० मधील ही पातळी मानवी आरोग्यासाठी आणि आरामासाठी देखील योग्य मानली जाते. जर ते यापेक्षा जास्त किंवा कमी असेल तर तुम्हाला नीट झोप येत नाही. म्हणून, जर घरातील आर्द्रता ३०% पेक्षा कमी असेल, तर तुम्हाला त्वचा आणि घशात कोरडेपणा जाणवेल आणि श्वास घेण्यास त्रास होईल. आणि जर आर्द्रता यापेक्षा जास्त असेल तर बुरशी आणि बॅक्टेरिया सारख्या गोष्टी देखील वाढू लागतात. तर आर्द्रतेची तीव्रता काय करते? ते तुमच्या घरातील हवा संतुलित करते. जर आर्द्रता कमी असेल, तर ती आर्द्रता वाढवून स्थिर प्रवाहापासून संरक्षण करते. तर, येणारी कोरडी हवा म्हणजे स्थिर प्रवाहाच्या निर्मितीला प्रोत्साहन देते

म्हणजे त्याच्या उपस्थितीत विद्युत प्रवाह वाढतो आणि जेव्हा हवेत आर्द्रता कमी असते तेव्हा इलेक्ट्रॉनची देवाणघेवाण सहजपणे होते, ते एकमेकांमध्ये सहजपणे हस्तांतरित होतात, ज्यामुळे ते एकमेकांच्या शरीरात देखील जमा होतात, जर तुमच्या घरातील हवा ओलसर राहिली तर ते इलेक्ट्रॉन सहजपणे पसरवेल आणि चार्ज जमा होण्याची स्थिती आणि शक्यता कमी होईल, ज्यामुळे तुम्हाला कमी विद्युत प्रवाह जाणवेल.

**डॉक्टर सुनील भगत**
**प्रधान सचिव महाराष्ट्र**
**अंधश्रद्धा निर्मूलन समिती**
**नागपूर. मोबाईल नंबर 94 230 64 391**

## सरकार कठोर; स्थानिक प्रशासन मूक,रेवदंड्यात विमल गुटखा खुलेआम

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

आता गुटखा माफियांची खैर नाही! महाराष्ट्र सरकारची मोठी घोषणा – गुटखा विक्रीवर 'सरळ मकोका' लावण्याची तयारी ,महाराष्ट्रात गुटखा माफियांच्या धंद्यावर राज्य सरकारने अक्षरशः गिलोटीन चालवण्याची तयारी केली आहे. गुटखा उत्पादन, वाहतूक आणि विक्रीवर आधीच बंदी असतानाही सुरू असलेल्या बेकायदेशीर व्यवहारांवर आता सरळ मकोका लावण्याचा राज्य सरकार गंभीरपणे विचार करत आहे.अन्न व औषध प्रशासन (FDA) मंत्री नरहरी झिरवाळ यांनी स्पष्ट केले की, गुटख्याची उपलब्धता मर्यादित करण्यासाठी आणि तंबाखू माफियांना जेरबंद करण्यासाठी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (MCOCA) लागू करण्याची प्रक्रिया सुरु आहे.झिरवाळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, बाहेरून येणाऱ्या बेकायदेशीर गुटख्याच्या खेपा विद्यार्थ्यांच्या आणि तरुणांच्या आरोग्यावर घातक परिणाम करत आहेत. त्यामुळे गुटखा कंपन्यांचे मालक, संचालक तसेच या गैरव्यवहारामागील सूत्रधारांवर आता मकोकाच्या जाळ्यात ओढण्याची तयारी प्रशासन करत आहे.या संदर्भातील प्रस्ताव कायदा व न्याय विभागाकडे पाठवण्याची कार्यवाही सुरु झाली असून, राज्यभरात गुटखा बंदीची अंमलबजावणी अधिक कठोर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कर्करोगजन्य उत्पादनांविरुद्ध जिल्हा पातळीवर जनजागृती मोहिमांना देखील वेग येणार आहे. पनवेल–रेवदंडा गुटखा मार्गाचा पर्दाफाश: "खुलेआम विक्री, स्थानिक प्रशासन गप्प!"राज्य सरकार गुटखा माफियांच्या मुसक्या आवळण्यासाठी मोठी मोहीम उभारत असताना, रेवदंडामध्ये मात्र खुलेआम गुटखा विक्रीचा उघड उघड बाजार सुरूच असल्याची नागरिकांमध्ये तीव्र चर्चा आहे. पनवेलहून येणाऱ्या वाहनांद्वारे गुटखा रेवदंडात पोहोचत असल्याचे गंभीर आरोप नागरिक करत आहेत.विशेष म्हणजे रेवदंडा ब्रीज ते रेवदंडा हायस्कूलपर्यंत. 'विमल' गुटख्याची सर्वात मोठी आणि खुलेआम विक्री सुरू असल्याचे प्रत्यक्ष दृश्य नागरिकांना दिसत असल्याची माहिती समोर येत आहे.सरकार एका बाजूला मकोकासारखा कठोर कायदा लागू करण्याचा विचार करत असताना, स्थानिक प्रशासन मात्र डोळेझाक करत असल्याचा सवाल नागरिक उघडपणे उपस्थित करत आहेत.

नागरिकांचा थेट प्रश्न — "राज्यात मकोका, पण रेवदंड्यातील उघडी विक्री थांबवणार कोण?"रेवदंडा परिसरातील पालक, विद्यार्थी आणि स्थानिक नागरिक यांची चिंता वाढली आहे. खुलेआम विक्री असूनही स्थानिक पोलीस व प्रशासन कारवाई का करत नाही?कोणाच्या राजरोस संरक्षणाखाली हा धंदा फोफावतोय?हा प्रश्न आता सरळ सरळ प्रशासनाला धडक मारू लागला आहे.संपूर्ण महाराष्ट्रात मोठा मुद्दा ठरणार!राज्य सरकारची 'गुटखा माफियाविरोधातील मोहीम' आणि रेवदंड्यातील 'खुलेआम विक्री' ही विरोधाभासी स्थिती आता मोठा चर्चेचा विषय ठरत आहे.सध्या नागरिकांची एकच मागणी"रेवदंड्यातील खुलेआम गुटखा विक्रेत्यांवर तात्काळ धडक कारवाई करा!"

## मतदान व मतमोजणीच्या दिवशी भरणारे आठवडी बाजार राहणार बंद

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

नांदेड -19 नोव्हेंबर जिल्ह्यात नगरपरिषदा व नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक मतदानाच्या दिवशी मंगळवार 2 डिसेंबर 2025 व बुधवार 3 डिसेंबर 2025 मतमोजणीच्या दिवशी जिल्ह्यात भरणारे सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश मार्केट ॲंड फेअर ॲक्ट 1862 चे कलम 5 अन्वये जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी निर्गमीत केले आहेत.

नगरपरिषद व नगरपंचायत मतदार संघात मंगळवार 2 डिसेंबर 2025 रोजी मतदान व बुधवार 3 डिसेंबर 2025 रोजी मतमोजणी होणार आहे. तुयाअनुषंगाने पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मतदान व मतमोजणी दिनांकास जिल्ह्यात भरणारे सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्यास आदेशित केले आहे.

मंगळवार 2 डिसेंबर 2025 रोजी मतदानाच्या दिवशी आठवडी बाजार भरणाऱ्या ठिकाणाची नावे पुढीलप्रमाणे आहेत. बिलोली येथे जनावराचा बाजार तर कुंडलवाडी, उमरी, लोहा येथे आठवडी बाजार तर मतमोजणीच्या दिवशी म्हणजेच 3 डिसेंबर 2025 रोजी हिमायतनगर याठिकाणचे आठवडी बाजार दुसऱ्या दिवशी म्हणजे गुरुवार 4 डिसेंबर 2025 रोजी भरविण्यात यावेत असे आदेश निर्गमित केले आहे




## राज्यस्तरीय आदिवासी विकास विभागाच्या विविध वस्तू प्रदर्शन व विक्री कार्यक्रमामध्ये गोंदिया जिल्हयातील आश्रमशाळेतील मुलींचा सहभाग

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड प्रतिनिधी गोंदिया जिल्हा**

वीस हजारांच्या गोंडी व बांबू कलाकृती विक्री. .

जिल्हाधिकारी यांच्या स्किल डेव्हलोपमेंट संकल्पना व योजनेतून शिकत आहेत कलाकृती. .

मंत्री महोदय यांनी केले विद्यार्थिनींच्या कलाकृतींचे कौतुक. .

दिनांक 15 नोव्हेंबर रोजी भगवान बिरसा मुंडा यांचा 150 व्या जन्मदिनी नागपूर येथे तिनंदिवाशीय जनजातीय गौरव दिवस हा राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सव कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. सदर महोत्सवात राज्यस्तरीय आदिवासी पारंपारिक हस्तकला प्रदर्शन व विक्रि, आदिवासी पारंपारिक नृत्य स्पर्धा तसेच इतर अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याठिकाणी देवरी प्रकल्पातील आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थिनींनी तयार केलेल्या वस्तूचे प्रदर्शन केले.

विशेष म्हणजे या सहभागामध्ये मुलींनी गोंडी कलेच्या माध्यमातून विविध वस्तूवर गोंडी चित्र रेखाटले होते यामध्ये फाईल, पेन फोल्डर, डायरी, स्कार्प, ज्वेलरी बॉक्स, Key Holder, गोंडि पेंटिग, सजावटिच्या वस्तू अश्या वस्तू विक्रिला ठेवलेल्या होत्या.

त्याच बरोबर चंद्रपुर येथील बांबु संशोधन केंद्राच्या माध्यमातून उन्हाळी शिबिरामध्ये प्रशिक्षित झालेल्या मुलींनी बांबू पासून विविध वस्तू बनविल्या आणि विक्रिला ठेवलेल्या होत्या. या प्रदर्शनी मध्ये मुलींनी जवळ-जवळ दोन ते तिन दिवसामध्ये वीस हजाराच्या वस्तूची विक्रि करून आपल्या मध्ये असलेले प्रदर्शनात्मक, कलात्मक आणि मार्केटिंगची चुणूक दाखवून दिली.

प्रदर्शन व विक्रि कार्यक्रमादरम्यान मा.ना. प्रा.डॉ.श्री.अशोक ऊईके मंत्री आदिवासी विकास तसेच श्री.मा.ना.नरहरी झिरवळ मंत्री अन्न व औषध प्रशासन तसेच मा.श्री. संजय पुराम आमदार आमगाव विधानसभा क्षेत्र तसेच आदिवासी विकास विभागाचे सचिव श्री.विजय वाघमारे, मा.आयुक्त लिना बन्सोड मॅडम, मा.अप्पर आयुक्त आयुषी सिंग यांनी भेटि दिल्या. विद्यार्थ्यांनी केलेल्या कलाकृतीची प्रशंसा केली. सदर तिन दिवसीय कार्यक्रमा मध्ये महाराष्ट्रातिल विविध समुदायाचे नागरीक भेटिसाठी आलेले होते आणि त्यांनी मुलींनी बनविलेल्या कलाकृतीचे व वस्तूचे प्रशंसा केली व वस्तू खरेदि केल्या. सदर प्रदर्शनाच्या माध्यमातून मुलींमध्ये वेगळा आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत झालेली आहे. देवरी प्रकल्प कार्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या उन्हाळी शिबिर व हिवाळी शिबिर मध्ये मुलींनी या कलाकृती शिकल्या याच्या पुढे ही या मुलींना गोंडि कला आणि बांबू पासून विविध वस्तू बनविणाऱ्या तज्ञ प्रशिक्षकांच्या मार्फत आणखी उच्च प्रशिक्षण देण्याचे प्रकल्पाने आयोजिले असून येणाऱ्या कालावधी मध्येहि या विद्यार्थिनींच्या माध्यमातून आश्रमशाळेच्या ईतर मुलींनाही कलात्मक दृष्टया भक्कम बनविण्यासाठि प्रयत्न करण्यात येणार आहेत. विशेषत: विद्यार्थी आश्रमशाळेमध्ये निवासी असल्याकरणाने बहुतांश वेळ अभ्यासाव्यतिरिक्त कलाकृती मध्ये गुंतवला जावा हा या मागचा उद्देश असून यामधील विद्यार्थिनी मधील कलाकृतीचे गुण पुढे आणणे आणि त्यातून स्वयंम रोजगाराचे साधन तयार करण्यात येणार आहे.

मा.मंत्री महोदय झिरवळ साहेब यांनी भेट देवून मुलींची प्रशंसा केली व मार्केटिंग कशी करायची व ग्राहकांशी कसे बोलावे याबद्यल मार्गदर्शन केले तसेच माजी अपर आयुक्त मा.ठाकरे साहेब यांनी सुध्दा भेट देवून मुलींची प्रशंसा व मार्गदर्शन केले.

तसेच इतर प्रकल्पातील विस्तार अधिकारी, सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांनी आपल्या प्रकल्पामध्येही हि संकल्पना लागु करण्यास माहिती जाणून घेतली. एकंदरीत देवरी प्रकल्पातील आश्रमशाळेतील विद्यार्थीनींनी कलेच्या माध्यमातून शिक्षणासोबतच प्रदर्शनित विविध वस्तूची विक्रि करून जे वीस हजारांचे अर्थाजन केले ते इतर विद्यार्थ्यासाठि नक्कीच प्रेरणादायी ठरतील.

देवरी प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी मा.उमेश काशिद, सहाय्यक प्रकल्प अधिकारी डॉ.सायली चिखलिकर, कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी, तसेच आश्रमशाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे विद्यार्थीनींनी यश प्राप्त करण्यास मदत झाली आणि विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणे व कलागुणांना पुरक वातावरण देण्यास प्रकल्प कार्यालयाकडून आवश्यक ते प्रयत्न सुरु आहे.

उन्हाळी शिबीर आणि मा.जिल्हाधिकारी यांच्या स्किल डेव्हलोपमेंट संकल्पनेचा परिणाम दिसून आला, या विद्यार्थ्यांना आणखी तज्ञ प्रशिक्षण आणि त्यातून आत्मविश्वास,शिक्षण अर्थार्जन,यानुसार भविष्यात नियोजन करण्यात येत आहे.

**- उमेश काशिद**
**प्रकल्प अधिकारी देवरी**

# प्रियाताईंच्या पुढाकारातून माहीम विधानसभा शाखा क्र. 191 तर्फे मोफत नेत्र तपासणी व चष्मा वाटप शिबिर

**दैनिक युवक आधार**
**- किशोर गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**
**दादर (प्रतिनिधी):**

सामाजिक बांधिलकी जपत, शिवसेना महिला विभागप्रमुख सौ. प्रिया सरवणकर-गुरव यांच्या संवेदनशील नेतृत्वामुळे अनेक गरजूंच्या जीवनात उजळला नवा प्रकाश...



दादर परिसरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने शिवसेना शाखा क्र. १९१ तर्फे भव्य मोफत नेत्र तपासणी व चष्मा वाटप शिबिर आयोजित करण्यात आले. कार्यसम्राट मा. आमदार, शिवसेना उपनेते आणि अध्यक्ष, श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (राज्यमंत्री दर्जा) मा. श्री. सदा सरवणकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिवसेना महिला विभागप्रमुख सौ. प्रिया सरवणकर-गुरव यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

शिबिरामध्ये अनुभवी व तज्ञ नेत्ररोग तज्ज्ञांची टीम उपस्थित होती. नागरिकांच्या डोळ्यांची तपशीलवार तपासणी, नंबर तपासणी, दृष्टीदोष निदान, तसेच विविध नेत्रविकारांबाबत सल्लामसलत अशा सर्व सेवा पूर्णपणे मोफत देण्यात आल्या. विशेष म्हणजे, तपासणीनंतर पात्र ठरलेल्या नागरिकांना मोफत नंबरचे चष्मे वाटप करण्यात आले.

यावेळी परिसरातील वरिष्ठ नागरिक, महिलावर्ग, तरुण आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होत उपक्रमाचा लाभ घेतला. अनेक ज्येष्ठ नागरिकांनी आरोग्याच्या तक्रारींबाबत डॉक्टरांकडून योग्य मार्गदर्शन मिळाल्याचे सांगितले. काही नागरिकांनी दीर्घकाळापासून दृष्टीसंबंधी अडचणी असूनही तपासणीसाठी वेळ मिळत नसल्याचे नमूद करत, अशा शिबिरांमुळे त्यांना योग्य सुविधा एका ठिकाणी उपलब्ध होतात असे सांगितले.

शिबिराच्या यशात शिवसेना शाखा क्र. १९१ च्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचेही मोलाचे योगदान राहिले. शिबिराचे नियोजन, नागरिकांना दिलेली सेवा आणि व्यवस्थापनाबद्दल सर्वत्र कौतुक व्यक्त करण्यात आले.

सौ. प्रिया सरवणकर-गुरव यांनी सांगितले की, "शिवसेनेच्या सेवाभावी परंपरेनुसार सामान्य नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे ही आमची जबाबदारी आहे. भविष्यातही अशा उपक्रमांची मालिका सुरू राहील."

तसेच नागरिकांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत आयोजकांचे, विशेषतः सौ. प्रिया सरवणकर-गुरव यांचे मनःपूर्वक आभार मानले. समाजासाठी उपयुक्त व जनजागृती करणारे उपक्रम सातत्याने राबवल्यास आरोग्यदायी समाजनिर्मितीला मोठी चालना मिळते, अशी भावना नागरिकांतून व्यक्त झाली.

मोफत नेत्र तपासणी आणि चष्मा वाटप हा केवळ उपक्रम नव्हे, तर प्रभाग क्र. १९१च्या नागरिकांसाठी जनसेवेचा एक सुंदर सोहळा ठरला!

# घातक वळणाने घेतले चार जीव! ताम्हिणी घाटात थारचा भीषण अपघात

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी:-सचिन पवार**

माणगांव :-पुणे–माणगाव मार्गावरील ताम्हिणी घाटात रविवारी झालेल्या भीषण अपघातात थार गाडी दरीत कोसळून चार जणांचा मृत्यू झाला. तीव्र वळणावर अचानक वाहनावरील ताबा सुटल्याने थार खोल दरीत कोसळली. अपघात एवढा गंभीर होता की वाहनाचे तुकडे तुकडे होऊन विखुरलेले आढळले. घटनास्थळाची उंच–खोल रचना लक्षात घेता मृतदेह शोधण्यासाठी पोलिस व बचाव पथकांना ड्रोनची मदत घ्यावी लागत आहे.

अपघाताची माहिती मिळाल्यानंतर माणगाव पोलिस व स्थानिक बचाव दलाने त्वरित घटनास्थळी धाव घेतली. पोलीस निरीक्षक निवृत्ती बोराडे यांनी सांगितले, "प्रथमदर्शनी वाहनावरील नियंत्रण सुटल्यामुळेच ही दुर्घटना घडली असावी. ड्रोनद्वारे परिसर स्कॅन करत असून चार मृतदेह सापडले आहेत." दरीची खोली, दगड आणि जंगलामुळे मृतदेह वर आणण्याचे काम अतिशय जोखमीचे ठरत आहे.

निसर्गरम्यतेसाठी प्रसिद्ध असला तरी ताम्हिणी घाटातील तीव्र वळणे, धुके आणि रस्त्यांची खराब अवस्था यामुळे येथे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. या दुर्घटनेमुळे चार कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात गंभीर शोककळा पसरली आहे. पुढील तपास सुरू आहे.




## कविवर्य नारायण सुर्वे यांच्या 'जन्मशताब्दी'निमित्त, ठाण्यात २२ नोव्हेंबर रोजी, "साहित्य विचार जागर" कार्यक्रमाचे आयोजन!

**दैनिक युवक आधार**
**ठाणे (प्रतिनिधी) :**

'कामगार-कवी' अशी सर्वमान्य ओळख असलेले पद्मश्री नारायण सुर्वे यांच्या 'जन्मशताब्दी'निमित्त, दि. २२ नोव्हेंबर-२०२५ रोजी, सायंकाळी ५ वाजता, ठाण्यातील मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सभागृहात "साहित्य विचार जागर" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमात प्रज्ञा पवार, नीरजा, छाया कोरेगांवकर, कविता मोरवणकर, सुरेखा पैठणे, अनिता भारती, बबन सरवदे, शिवा इंगोले, शिवराम सुखी आदी मान्यवर कवी, आपली एक आणि नारायण सुर्वे यांची एक, अशा प्रत्येकी दोन कविता सादर करणार असल्याची माहिती, 'कामगार-कवी नारायण सुर्वे जन्मशताब्दी महोत्सव समिती'चे अध्यक्ष व ज्येष्ठ कामगार-नेते राजन राजे यांनी पत्रकार परिषदेत दिली. 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'च्या कार्यालयात, मंगळवारी (दि. १८ नोव्हेंबर-२०२५) पार पडलेल्या या पत्रकार परिषदेत, समितीचे निमंत्रक कॉ. उदय चौधरी, ॲड. नाना अहिरे, कॉ. अविनाश कदम, आंबेडकरी विचारवंत आनंदा होवाळ, आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती. दरम्यान, दि. २२ नोव्हेंबर-२०२५ रोजी, होणाऱ्या कविवर्य नारायण सुर्वे यांच्या, "साहित्य विचार जागर" या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवी अरुण म्हात्रे करणार असून, 'महाराष्ट्र राज्य लाल बावटा शेतमजूर युनियन'चे कार्याध्यक्ष कॉ. राम बाहेती यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तर, 'नारायण सुर्वे यांच्या कविता आणि विचार' या विषयावर, ज्येष्ठ आंबेडकरवादी विचारवंत अर्जुन डांगळे हे, आपले मनोगत व्यक्त करणार आहेत. यावेळी एका लघुपटाच्या माध्यमातून, कविवर्य नारायण सुर्वे यांचा जीवनपट उलगडून दाखविण्यात येणार असल्याची माहिती, समितीचे अध्यक्ष व ज्येष्ठ कामगार-नेते, राजन राजे यांनी पत्रकार परिषदेत शेवटी दिली.

# भाजपमध्ये वैरभाव नाही, एकोप्यानेच विकासाचा व विजयाचा मार्ग सुकर होणार " विजयकुमार कोठारी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी ता. चिखली**
**सिद्धार्थ धंदरे.**

आज सकाळी प्रभाग क्र.५ मध्ये आ. सौ. श्वेता महाले पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सदानंद नगर येथील हनुमान मंदिरात प्रचार मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. प्रचाराचे नारळ ॲड. विजयकुमार कोठारी यांच्या हस्ते फोडण्यात आले. त्यानंतर मदनीशहा वली दर्ग्यावर नगराध्यक्ष पदाचे उमेदवार पंडित दादा देशमुख व प्रभाग ५ मधील नगरसेवक उमेदवारांनी चादर चढवून आशीर्वाद घेतला. कार्यक्रमानंतर परिसरातून भव्य रॅली काढण्यात आली. चिखली विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाच्या आमदार सौ. श्वेता महाले पाटील यांच्या नेतृत्वात नगराध्यक्ष पदाचे उमेदवार पंडित दादा देशमुख आणि स्थानिक नगरसेवक उमेदवारांच्या समर्थनार्थ ही रॅली आयोजित करण्यात आली होती. केंद्र, राज्य आणि आमदार या सर्व स्तरांवर भाजपाची सत्ता असल्याने चिखली शहराचा विकास वेगाने होत आहे व त्याच वेगाने विकास करण्याची संधी निर्माण झाली असून, "नगराध्यक्ष पदही भाजपालाच द्या, विकास करण्यासाठी हीच योग्य संधी आहे," अशी ग्वाही आमदार श्वेता महाले यांनी यावेळी दिली.यापूर्वी कधीही न पाहिलेला विकास चिखलीकरांना दाखवण्याची ताकद भाजपामध्ये आहे, असेही त्या म्हणाल्या. पुढे बोलताना त्यांनी पंडित दादा देशमुख यांच्या व्यक्तिमत्त्वाचा उल्लेख करताना सांगितले की, "पंडित दादा हे सर्वसामान्य लोकांमधील सर्वसामान्य चेहरा आहे. आपला, हक्काचा, सहज उपलब्ध होणारा असा माणूस. त्यामुळे चिखलीतील जनता त्यांना मनापासून साथ देईल याबद्दल मला बिलकुल शंका नाही."



प्रचाराचे नारळ फोडताना एडवोकेट विजयकुमार कोठारी म्हणाले, "भाजपमध्ये वैरभाव, शत्रुत्व किंवा स्पर्धा नसते; येथे सहभाव, एकोप्याची भावना आणि परस्पर सहकार्यानेच विकास साधण्याची परंपरा आहे. आम्ही एकमेकांना पुढे नेतो, अडथळे नाही तर मार्ग तयार करतो." या रॅलीदरम्यान पंडित दादा देशमुख यांच्याबाबत स्थानिकांमध्ये उत्साह पाहायला मिळाला. साधेपणा, जनसंपर्क आणि सर्वांना जोडून घेण्याची शैली यामुळे'सर्वसामान्यांचा सर्वात जवळचा चेहरा' अशी त्यांची ओळख अधिक दृढ होत असल्याचे चित्र दिसले. प्रभाग ५ मधील नागरिकांमध्ये उमेदवारांविषयीचा सकारात्मक प्रतिसाद या प्रचार रॅलीतून स्पष्टपणे जाणवला...

## वेळेअभावी सौ. रेखा गोपाल तायडे यांचा उमेदवारी अर्ज होऊ शकला नाही दाखल.

**प्रभाग क्र.4 मधील मतदारांची केली दिलगिरी व्यक्त .**

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

स्वराज्य पक्षाचे प्रभाग क्र.4 मधून अनुसूचित जाती प्रवर्गातून अधिकृत उमेदवरा सौ.रेखा गोपाल तायडे. वेळेअभावी उमेदवारी अर्ज दाखल करू शकले नाही. त्या मुळे त्यांनी प्रभाग क्र.4 मधील मतरांची दिलगिरी वेक्त केली आहे. प्रभागाचा चेहरा मोहरा बदलण्याचे ध्येय त्यांनी समोर ठेवले होते. प्रभागाच्या विकासाकरीता त्यांची चागले नियोजन अखले होते. स्वतः महिला असल्याने महिलांच्या समस्या जाणून होत्या. सगळ्या विषयांना हात घालत प्रभाग क्र.4 विकासाच्या शिखरावर न्यायचे हे स्वप्न होते. प्रभागातील क्र.4 मधील मतदारांनी प्रत्यक्षरीत्या त्याच्यावर विश्वास दाखविला होता. युवकांची फळी त्याच्या कडे होती. महिला संघटन ही पुरेस होत. वेडेअभावी अर्ज दाखल न करू शकल्याची खंत त्यांनी प्रसार माध्यमाची बोलून दाखवली होणारा विजय धुळीत मिळाला या बद्दल त्यांनी प्रभाग क्र.4 मधील मतदारांची त्यांनी दीलगिरी व्यक्त केली.



# धानोरा केंद्राच्या वतीने राष्ट्रीय खेळाडू श्री बाळासाहेब शेंदूरकर यांचा सत्कार संपन्न

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी**
**बाळासाहेब रकटाटे**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिक्षक, अधिकारी व कर्मचारी क्रीडा स्पर्धा २०२५ मध्ये आष्टी तालुक्याचे राष्ट्रीय खेळाडू श्री. बाळासाहेब शेंदूरकर सर यांनी पुन्हा एकदा आपले खेळाडूवृत्तीचे वर्चस्व सिद्ध केले आहे.

गोळाफेक या प्रकारात त्यांनी उत्कृष्ट कामगिरी करीत आष्टी तालुक्यातून विभागीय स्पर्धेसाठी निवड मिळवली असून तालुक्याचे नाव मानाने उंचावले आहे.



शेंदूरकर सरांची खेळातील वाटचाल ही अत्यंत प्रेरणादायी आहे. १९९६-९७ सालापासून त्यांनी जिल्हा परिषद कर्मचारी मराठवाडा विभागीय क्रीडा स्पर्धांमध्ये सलग चमकदार कामगिरी करत १००, २०० आणि ४०० मीटर धावण्याच्या तिन्ही स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला होता. त्यांच्या या अप्रतिम प्रदर्शनामुळे बीड जिल्ह्याला छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय जनरल चॅम्पियनशिप जिंकण्याचा मान मिळाला होता.

इतक्या वर्षांनंतरही त्यांनी आपली ॲथलेटिक्समधील निष्ठा, जिद्द आणि कौशल्य प्रामाणिकपणे सांभाळले आहे. आजही मैदानावर तेवढ्याच जोमाने, शिस्तीने आणि आत्मविश्वासाने उतरत असल्याचे दृश्य युवा पिढीसाठी आदर्श ठरणारे आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल तालुक्याच्या गट शिक्षणाधिकारी सौ सीमा काळे मॅडम धानोरा केंद्राचे केंद्रीय मुख्याध्यापक श्री. सुनील तरटे सर, केंद्रप्रमुख श्री. जावेद पठाण साहेब प्राथमिक शिक्षक सघाचे तालुका अध्यक्ष संदीप खराडे, क्रीडा मार्गदर्शक श्री. जुनेद साहेब, पतसंस्थेचे सचिव श्री. विलास मोरे सर, शिक्षक नेते श्री. बाळासाहेब महाडिक सर, श्री. रमेश भापकर सर, श्री. आमले सर, श्री. रामदास काळे सर, श्री. पोपटराव काळे सर, श्री. असलम शेख सर, सतीश एकशिंगे, अतुल चव्हाण, संतोष आटोळे तसेच केंद्रातील सर्व मान्यवर शिक्षकांनी शेंदूरकर सरांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून त्यांचे हार्दिक अभिनंदन केले.

क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांचे योगदान लक्षणीय असून त्यांचा प्रवास सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.

आगामी विभागीय स्पर्धेसाठी श्री. बाळासाहेब शेंदूरकर सरांना मनःपूर्वक शुभेच्छा!

त्यांच्या कामगिरीतून आष्टी तालुका आणि धानोरा केंद्र यांचा गौरव निश्चितच वाढेल, अशी सर्वांची खात्री आहे

# मंगेश चिवते यांच्या हस्ते 'अजिंक्य महाराष्ट्र न्यूज'चे संतोष लांडे सन्मानित

## शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशनतर्फे आरोग्य दूतांचा सन्मान सोहळा सम्पन्न

**दैनिक युवक आधार**
**किशोर गुडेकर,**
**मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**
**मुंबई :**

दिनांक १७ नोव्हेंबर रोजी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष आणि डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. बाळासाहेब ठाकरे व आनंद दिघे आरोग्य उपक्रमांतर्गत कार्यरत आरोग्य दूतांचा गौरव करण्यासाठी हा कार्यक्रम विशेष रित्या आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात अजिंक्य महाराष्ट्र न्यूजचे प्रतिनिधी संतोष लांडे यांचा विशेष सन्मान मंगेश चिवते यांच्या हस्ते करण्यात आला. चिवते यांनी लांडेंना आरोग्य दूत कृतज्ञता पत्र व सन्मानचिन्ह प्रदान करून त्यांच्या सामाजिक, आरोग्यविषयक व जनसेवा कार्याचे कौतुक केले.



सर्वसामान्य जनतेच्या सेवेत झटणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान करण्याचा हा उपक्रम त्यांच्या कार्याला नवी प्रेरणा देणारा असल्याचे आयोजकांनी सांगितले.

राज्याचे उपमुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा यशस्वीपणे पार पडला.

# डॉ. कुलदीप भालेराव यांना देवांग मेहता नॅशनल एज्युकेशन अवॉर्ड

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई, प्रतिनिधी**

भारती विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, नवी मुंबई येथील प्रा.डॉ. कुलदीप भालेराव यांना देवांग मेहता नॅशनल एज्युकेशन अवॉर्ड "व्यवस्थापन अभ्यास शाखेतील उत्कृष्ट प्राध्यापक" हा प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्कार दि. १९ नोव्हेंबर २०२५ रोजी मुंबईतील ताज लँड्स एण्ड येथे आयोजित सोहळ्यात प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार डॉ. भालेराव यांच्या व्यवस्थापन शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाचा, शैक्षणिक उत्कृष्टतेप्रती असलेल्या त्यांच्या अढळ निष्ठेचा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याचा उच्च दर्जाचा पुरावा मानला जातो.

निवड समितीने त्यांच्या नाविन्यपूर्ण अध्यापनशैली, संशोधनाभिमुख दृष्टिकोन, शैक्षणिक विकास उपक्रमांमधील सक्रिय सहभाग आणि भविष्यातील नेतृत्त्व घडवण्यातील प्रभावी भूमिकेची विशेष प्रशंसा केली.

गेल्या अनेक वर्षांत उद्योग आणि शैक्षणिक दुवा मजबूत करण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या करिअर विकासासाठी आणि संस्थेची शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.



डॉ. भालेराव यांनी या पुरस्काराचे श्रेय विद्यार्थी, माजी विद्यार्थी, उद्योग क्षेत्रातील सहकारी, शैक्षणिक सहयोगी तसेच भारती विद्यापीठाने विविध उपक्रम राबवण्याचा दिलेल्या संधींना दिले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## जुगारावर कारवाई

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

खांदेश्वर पोलिसांनी जुगारावर कारवाई करत तिघांवर 16 नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल केला.

आसुडगाव येथील देशी तडका हॉटेलच्या समोरील नवीन बांधकाम चालू असलेल्या साईटच्या लगत पत्राच्या शेडमध्ये काही ईसम जूगार खेळत असल्याची माहिती खांदेश्वर पोलिसांना मिळाली. त्या ठिकाणी पोलिसांनी धाड टाकली. यावेळी महेश जगन्नाथ वीरकर (खांदा कॉलनी), राजू बंडू गव्हाणे (कळंबोली), दशरथ शहा nerul.editorial@gmail.com जी जाधव (कळंबोली) या तिघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून बाराशे रुपये जप्त करण्यात आले.

## सोन्याची चैन चोरली

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: सोन्याची चैन चोरल्या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात 17 नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

निहार मंजू ह्या ठाणे नाका रोड, बावन बंगला, पनवेल येथे राहत असून त्यांच्या वडिलांचा बुल्स ग्रीन्स ट्यूलिप येथे फ्लॅट आहे. 15 नोव्हेंबर रोजी निहार आणि त्याचे मित्र यांनी इंडियाबुल्स या ठिकाणी फ्लॅटवर जाण्याचे ठरवले. ते त्या ठिकाणी गेले आणि त्या ठिकाणी गप्पा मारत बसले. ते बाहेर फेरफटका मारून आले आणि बेडरूम मध्ये झोपले.16 नोव्हेंबर रोजी ते सकाळी नऊ वाजता झोपेतून उठले असता त्याच्या गळयातील दोन तोळयाची सोन्याची चैन आणि डोक्यातील ग्रे रंगाची बिनी कॅप दिसली नाही. याबाबत मित्रांना विचारणा केली यावेळी व्हेन डिसूजा हा तेथे नव्हता. चैन चा शोध घेतला मात्र सापडून आली नाही. सीसीटीव्ही कॅमेरे पाहिले असता व्हेन डिसूजा हा लिफ्ट मधून बिनी कॅप घालून जाताना दिसून आला.

## लोखंडी पाईपने केली मारहाण

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: केस कापण्यास नंबर न दिल्याचा राग मनात येऊन शिवीगाळ करून लोखंडी पाईपने मारहाण केल्याप्रकरणी स्वामी मढवी यांच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात 17 नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

संदीप डांगरकर हे हरिग्राम येथे राहत असून ते गावातील सलून मध्ये केस कापण्यासाठी गेले. त्यांचा नंबर आल्यानंतर खुर्चीवर बसले. यावेळी गावातील स्वामी याने तुझा नंबर मला दे असे बोलला असता त्याला नकार दिल्याने त्याने धक्काबुक्की केली आणि त्याने त्याच्या हातातील लोखंडी पाईपने संदीपला मारण्याचा प्रयत्न केला. हात पुढे करून मार वाचवत असताना लोखंडी पाईप डोक्यात मारून गंभीर दुखापत झाली.

## 16 लाखांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

व्यवसायाच्या गुंतवणुकीसाठी दिलेले सोळा लाख रुपये परत न करता फसवणूक केल्या प्रकरणी निलेश निफाडे पाटील (राहणार शिरवाडे वणी, निफाड, नाशिक) यांच्या विरोधात कामोठे पोलीस ठाणे दाखल करण्यात आला. वर्षा या सेक्टर 19 कामोठे येथे राहत असून त्यांची निलेश निफाडे पाटील यांच्यासोबत ओळख झाली. त्याने तो मोठा व्यावसायिक असल्याचे भासवले होते. तो वर्षा यांच्याकडे पैसे मागू लागला. त्यानुसार त्यांनी त्यांना पैसे पाठवले. व्यवसायासाठी त्यांनी निलेश याला पैसे दिले. व्यवसायाच्या गुंतवणुकीसाठी एकूण 16 लाख रुपये घेऊन ते पैसे आज देतो उद्या देतो असे बोलून फसवणूक केली.

## एक कोटी 35 लाख 31 हजारांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

लोन काढलेल्या रकमेपेक्षा अधिकचे रक्कम देण्याचे आश्वासन देऊन सहा जणांची एक कोटी 35 लाख 31 हजार 490 रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अमित अशोक शेट्टी (राहणार सेक्टर आर टू माय गोपाळ सोसायटी वडघर) याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

किरण कांबळे हे करंजाडे, सेक्टर 5 येथे राहत असून त्यांची ओळख अमित अशोक शेट्टी यांच्याशी झाली. अमित शेट्टी यांनी त्याच्याकडे पैसे मागितले. पैसे दिल्यानंतर ते पैसे लगेच परत केल्याने त्यांचा व्यवहारावर विश्वास बसला. त्यानंतर अमित याने त्याच्याकडील चेक देऊन किरण यांच्या नावावर क्रोमा कामोठे येथून सॅमसंग कंपनीचा मोबाईल व आयफोन या वस्तू फायनान्स करून घेतल्या. त्या बदल्यात पाच लाखांचा चेक दिला. मोबाईलचे तीन हप्ते रेगुलर भरले. त्यानंतर जमिनीचे खोटे पेपर बनवले आणि किरण यांच्या नावावर ऑनलाईन पर्सनल लोन घेऊन पुन्हा नवीन मोबाईल विकत घेतले. त्या बदल्यात पंचवीस लाखांचा चेक दिला. किरण यांच्या पत्नीकडून तीन तोळयाचे मंगळसूत्र घेतले आणि त्या बदल्यात पाच तोळयाचे मंगळसूत्र आणून देतो असे सांगितले. मात्र मंगळसूत्र दिले नाही. असे एकूण 11 लाख 98 हजार रुपयांचे वस्तू आणि लोन घेतले. अमित शेट्टी यांनी ते चेक वटवण्यास नकार देऊन त्या बदल्यात खरेदी केलेले आणि लोन काढलेल्या रकमेपेक्षा अधिकचे रक्कम देण्याचे आश्वासन दिले. तसेच पनवेल परिसरात प्लॉट खरेदी करून देतो असे आश्वासन देऊन किरण यांच्या नावावर वस्तू आणि पर्सनल लोन काढले. त्याने वस्तूचे आणि पर्सनल लोनचे हप्ते भरले नाही. म्हणून किरण याने अमित याला फोन केला असता त्यांनी उडवा उडविची उत्तरे दिली. यावेळी मेहराज सावरटकर, विष्णू साळवे, रुपेश राजे, हिरालाल पवार, गणेश गोसावी यांची देखील एक कोटी 23 लाख 32 हजारांची फसवणूक केल्याचे त्यांना समजले.

## अंबानी कडे चालक म्हणून नोकरीला लावतो असे सांगून केली फसवणूक

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: अंबानी कडे चालक म्हणून नोकरीला लावतो असे आमिष दाखवून परदेशी नागरिकांची फसवणूक करणाऱ्या दिनेश मनोहर कदम आणि कविता दिनेश कदम (तळोजा) यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात सतरा नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

जेसन मरेंडा, तानिया मरेंडा आणि लिडन मरेंडा यांच्या ओळखीचे दिनेश मनोहर कदम आणि त्यांची पत्नी कविता दिनेश कदम यांनी जेसन याला अंबानीकडे चालक म्हणून नोकरीला लावतो असे आमिष दाखवले आणि त्याच्याकडून 60000 घेतले. त्यानंतर जेसन आणि तानिया यांच्याकडून पॅन कार्ड, आधार कार्ड घेऊन विजय सेल्स सीबीडी बेलापूर व वाशी सेक्टर 17 येथील मोबाईल शॉप मध्ये जाऊन मोबाईल, एसी, टीव्ही असे 4 लाख 87 हजार रुपये किमतीच्या वस्तू खरेदी केल्या. तसेच एना लीडन मरेंडा यांच्याकडून तीन ग्राम वजनाचे सोन्याचे कानातला रिंग आणि चार ग्राम वजनाची सोन्याची अंगठी घेऊन सोनाराकडे गहाण ठेवली आणि आरोपींनी ते पैसे घेतले. मात्र नोकरीला लावले नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# श्रीराम वैद्य "साऊ ज्योती सामाजिक संस्था महाराष्ट्र यांच्या वतीने "राष्ट्रीय भारत भूषण पुरस्कार-२०२५ ने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

विक्रोळी पार्क साईट येथील गुणवंत कामगार पुरस्कार-महाराष्ट्र शासन विजेते तसेच त्यांच्या पर्यावरण, शैक्षणिक, सामाजिक कार्याची दखल घेऊन श्री. श्रीराम विष्णू वैद्य यांना साऊ ज्योती सामाजिक संस्था महाराष्ट्र यांच्या वतीने "राष्ट्रीय भारत भूषण पुरस्कार -२०२५ ने सन्मानित करण्यात आले.











साऊ ज्योती सामाजिक संस्था महाराष्ट्र यांचा दि. १६ नोव्हेंबर रोजी भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे येथे राष्ट्रीय भारत भूषण पुरस्कार वितरण सोहळा

उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्रा. डॉ. शंकर अंदानी (साई इंडियन ट्रस्ट असो. न्यू दिल्ली अध्यक्ष ऐलिट चेंबर कॉमर्स इंडस्ट्री), मा. पुनम पाटील पोलीस उपनिरिक्षक, पुणे शहर, मा. युवराज कुमार मराठी सिने अभिनेता, मा. केतकी

गावडे अभिनेत्री, साऊ ज्योती संस्थेचे संस्थापक सचिन हाळदे, आयोजक विकास उबाळे, मा.संदीप रमेश शर्मा, (शिवसेना उपशहर प्रमुख नाशिक), मा. विष्णू देशमुख पोलीस सबइन्स्पेक्टर, मा. प्रफुल्ल सरोदे स्वीय सहाय्यक श्री. प्रतापराव जाधव केंद्रीय मंत्री इत्यादी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.श्रीराम वैद्य हे गेली ४५ वर्ष सामाजिक कार्यात कार्यरत आहेत. अनेक संघटनांवर पदाधिकारी,सदस्य म्हणून काम पाहत आहेत.त्यांना आजवर विशेष कार्यकारी अधिकारी,गणुवंत कामगार पुरस्कार, आदर्श मित्र पुरस्कार, राष्ट्रीय

सामाजिक एकता गौरव पुरस्कार, मुंबई रत्न पुरस्कार, समाज गौरव पुरस्कार, कोकण दिप सामाजिक सेवा पुरस्कार, कामगार भूषण पुरस्कार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रयत सेवक पुरस्कार, आदर्श मुंबईकर महापौर सन्मान पत्र, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्याचे गौरव पत्र, नशाबंदी मंडळ नागरिक समिती गौरवपत्र, रक्तदान शिबिर प्रशस्तीपत्र, कामगार सभा आकाशवाणी मुलाखत, नागरी संरक्षण दल, बृहनमुंबई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय फेलोशिप आदी पुरस्कार मिळालेले आहेत.ते कार्यकारी सदस्य महाराष्ट्र गुणवंत कामगार संघटना मुंबई,रायगड जिल्हा स्वकुळ साळी सेवा मंडळ मुंबई चे सदस्य आहेत. नेत्र तपासणी व चष्मा वाटप, एडस जनजागृती अभियान, पोलीओ डोस अभियान, बाल माता संगोपन शिबीर, शारीरिक वैद्यकिय तपासणी, मार्गदर्शन व उपचार केंद्र आदी शिबीर मध्ये त्याचा मोलाची कामगिरी आहे.शिवसेना ग्राहक संरक्षण मंच, गुरूदत्त मंडळ (कला, क्रिडा, शैक्षणिक) वि. पा. शा. मुंबई सल्लागार, गुरूदत्त पतपेढी (पार्क साईट, विक्रोळी (प) मुंबई सल्लागार / संचालक, वि. पा. सा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ - सहचिटणीस आहेत.श्री.श्रीराम विष्णू वैद्य (विशेष कार्यकारी अधिकारी,(डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय फेलो शिप विजेता)यांना सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आल्यामुळे त्याच्यावर अभिनंदनसह शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

# राजेश दामधर यांना राज्य स्तरीय पुरस्कार प्रदान !

**दैनिक युवक आधार**
वरूड सर्कल प्रतिनिधी ज्ञानेश्वर कुंडलिक निकाळजे

जालना जिल्ह्यातील जाफ्राबाद तालूक्यातील रहिवाशी असलेले राजकीय , सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार श्री राजेश दौलतराव दामधर यांना नागपूर येथील मदत सामाजिक संस्थेने डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट पत्रकार हा राज्य स्तरीय पुरस्कार या बहुमानाने सन्मानित केले आहे. राजेश दामधर हे तीस ते पस्तीस वर्षापासून निपक्ष , निर्भीड , निस्वार्थ , परखडपणे पत्रकारिता करित आहे. त्यांनी त्यांच्या लेखनीतुन प्रत्येक वेळा समय सुचक राहून त्या त्या वेळच्या विषयाला हात घालून लिखान केलेले आहे आणि अजूनही करित आहे तसेच कार्य ते पुढेही चालू ठेवणार असल्याचे कळते त्यांनी त्यांच्या आर्टिकल [ लेख ] , कविता , बातमी , जाहीरात आणि कॅमेरालेन्स मधून अनेक वेळा भावना व्यक्त केल्या आहे . त्याच प्रमाणे त्यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी , समस्या , वेदना यावरही अनेकदा प्रकाश टाकला आहे. त्यांनी त्यांच्या लेखनीतुन आवश्यक त्या वेळी संबधित सरकारला सुचनाही दिलेल्या आहेत . ते एका विशिष्ट पक्षाचे एकनिष्ठ कार्यकर्ते असले तरी त्यांनी सर्व पक्षीय बातम्या लिहल्या आहेत आज पर्यंत जे खरे आणि सत्य लिखाण केले असून ते परखड , निर्भीड वक्ते ही आहेत त्यांचा जन्म हा कोणताही राजकीय / सामाजिक वारसा नसलेल्या गरिब कुटूंबात झाला असल्यामुळे त्यांना राजकीय , सामाजिक , आर्थिक , व्यवसायिक परिस्थितीला अनेक वेळा फारच जिगरीने तोंड द्यावे लागलेले आहे . या सगळ्या गोष्टीची चौकशी करून नागपूर येथील मदत या संस्थेने या पुस्कारासाठी निवड केली होती . सदरील पुरस्कार वितरण सोहळा नुकताच संपन्न झाला असून हा पुस्कार राज्यस्तरीय सामाजिक कार्यकर्ता सम्मेलन घेऊन डॉं . बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट पत्रकार हा पुरस्कार मदत या सामजिक संस्थेचे सर्वेसर्वा संस्थापक सचिव श्रीमान दिनेशभाऊ वाघमारे , लातुर येथील सेवानिवृत्त न्यायधिश श्रीमान डॉं. संतोष कुमार जैस्वाल , जेष्ठ साहित्यीक श्रीमान तलवारे , करंज्य महत्म्य या साप्ताहिकाचे



मुख्य संपादक श्रीमान संजय कडोळ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल राजेश दामधर यांचे भारज आणि परिसरातील नातेवाईक , मित्र , शेजारी यांनी तोंडभरून कौतुक केले असून त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

## परतूर नगरपालिका निवडणुकीसाठी 36 मतदान केंद्राची स्थापना

**दैनिक युवक आधार**
**(अशोक ठोके)**

परतूर शहरात निवडणूक विभाग तसेच प्रशासनाची नगरपालिका निवडणुकीची जोरदार तयारी सुरु असून शहराच्या विविध प्रभागांमध्ये एकूण 36 मतदान केंद्रांची स्थापना करण्यात आली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार प्रणाली तायडे यांनी दिली. दरम्यान, काही प्रभागांमध्ये दोन तर काही प्रभागात तीन मतदान केंद्रे असतील असेही श्रीमती तायडे यांनी सांगितले.

परतूर नगरपालिका निवडणुकीसाठी एकूण 33 हजार 96 मतदार आहेत. यामध्ये 16 हजार 409 पुरुष तर 16 हजार 687 महिला मतदार आहेत. येत्या 2 डिसेंबर रोजी निवडणुकीची मतदान प्रक्रिया पार पडणार असून दुसऱ्या दिवशी अर्थात 3 डिसेंबर रोजी निकाल घोषित करण्यात येणार आहे. दरम्यान, शहराच्या विविध प्रभागांमध्ये एकूण 36 मतदान केंद्रे असणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार प्रणाली तायडे यांनी सांगितले




# हाडसानी येथे टिपू सुलतान जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**माहुर :(प्रतिनिधी) सय्यद ईसा**

हाडसानी गावात स्वातंत्र्यसेनानी व मैसूरच्या तत्कालीन शासक श्रीमंत टिपू सुलतान यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. ग्रामस्थांच्या पुढाकाराने आणि सामाजिक बांधिलकी जपत सकाळी टिपू चौक येथे कार्यक्रमाची सुरुवात झाली. चौकातील फलकाला पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवर व नागरिकांनी टिपू सुलतान यांच्या कार्याला अभिवादन केले. यावेळी राष्ट्रीय एकात्मता, स्वाभिमान आणि देशभक्तीचा संदेश देत तरुणांनी प्रेरणादायी घोषणा दिल्या.



यानंतर ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित कार्यक्रमात टिपू सुलतान यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यांच्या जीवनकार्याचा गौरव, लष्करी धोरणे, ब्रिटिश सत्तेविरुद्धची लढाई व विज्ञान-तंत्रज्ञानाबद्दलची प्रगत विचारसरणी यावर थोडक्यात प्रकाश टाकण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या लढाऊ परंपरेचा वारसा पुढे नेण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक बांधुकीसोबतच गावातील युवकांना नेतृत्वगुणांची प्रेरणा देण्याचा हेतू असल्याचे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमात गावातील नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. कार्यक्रमाला विनोद पाटील शिंदे, आगाखान पठाण,तानाजी मानभे, अर्जुन शिंदे, श्रीराम चव्हाण, कैलाश हुंबे, सुधीर लंडगेवाड, सतिश दवणे,मन्नान शेख, सदर खाजाखान, अरिफ खान, इब्राहिम सय्यद आदी मान्यवर उपस्थित होते. समाजातील सर्व घटकांच्या सहभागामुळे कार्यक्रमाला अधिक भव्यता प्राप्त झाल्याचे मत व्यक्त करण्यात आले. जयंती कार्यक्रमाचे आयोजन स्थानिक नागरिकांनी संयुक्तरित्या केले असून आगामी काळात अशा उपक्रमांद्वारे सामाजिक सलोखा आणि ऐतिहासिक वारसा जपण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# पनवेल महानगर पालिकेच्या निवडणुकीत उतरणार विद्या तामखेडे

**राजकारणासोबत समाजकारणातही आघाडी महिलांसाठी सातत्याने काम करणारी निर्भीड कार्यकर्ता**

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीला सुरुवात झाली असून,लवकरच पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकांचे वारे वाहू लागणार आहेत. महानगरपालिकेत पन्नास टक्के आरक्षण महिलांसाठी असल्याने कामोठे प्रभाग क्र.१३ मधून महिला राखीव जागेसाठी विद्या तामखेडे उतरणार आहेत. ह्या प्रभागात शेकाप आणि भाजपा अशी चार जागेसाठी लढत मागील निवडणुकीत पहायला मिळाली होती. यावेळी शेकाप आणि भाजपा यांना प्रत्येकी दोन जागा मिळाल्या होत्या. राजकारणासोबत समाजकारणातही आघाडी, महिलांसाठी सातत्याने काम करणारी निर्भीड कार्यकर्ता म्हणून विद्या तामखडे यांची ओळख आहे. प्रामुख्याने धनगर समाजाच्या तर सर्व धर्म समभाव धरून सातत्याने समाजाची सेवा करण्यात त्या नेहमीच पुढे राहिल्या. पनवेल महानगर पालिकेच्या प्रभाग क्रमांक १३ मधून भारतीय जनता पार्टीकडून उमेदवार म्हणून पुढे येत असून,त्यांच्या उमेदवारीला स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, महिला वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून आ.प्रशांत ठाकूर यांच्या विकासकामांच्या कार्य कर्तृत्वाने प्रभावित होऊन अहोरात्र जनतेसाठी वाहून घेणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून सक्रिय राजकारण करत असलेल्या तसेच समाजकारणातही ठसा उमटवला आहे. रुग्णालयात निराधार महिलांना मदत करणे त्यांना सक्षम करण्यासाठी अनेक योजना राबविणे, महिलांच्या मूलभूत सुविधा निवारण केंद्रांतील मदतकार्य असो, मध्यमवर्गीयांना समाजात भेडसावणाऱ्या समस्याचे शासन दरबारी मदत करणे सामाजिक उपक्रम असोत, त्या नेहमीच महिलांच्या न्यायासाठी, समस्यांसाठी आणि सक्षमीकरणासाठी पुढाकार घेताना दिसतात. पक्षाच्या प्रत्येक मोर्चे आंदोलन व सभांमधून महिलांचे नेतृत्व म्हणून महिला आघाडीच्या उपक्रमांमध्ये नेतृत्वाची भूमिका निभावली आहे. वंचित घटक, गरजू महिला, तरुणींना स्वावलंबी करण्यासाठी त्यांनी शिबिरे, जनजागृती मोहिमा आणि मार्गदर्शन उपक्रम राबवले आहेत. पाण्याचा प्रश्न, रस्त्यांचा, स्वच्छतेचा विषय असो किंवा न्याय हक्काचा त्या कायम एक रणरागिणीच्या भूमिकेत सर्वांच्या पुढे उभे राहून प्रत्येक समस्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील असतात.




महिला आरक्षणाच्या या निवडणुकीत प्रभाग क्र.१३ मधून त्यांनी उमेदवारी करण्याचा ठाम निश्चय केल्याने परिसरात उत्साहाचे वातावरण आहे. महिलांच्या प्रश्नांवर काम करणारी, जमिनीवर उतरून समस्यांकडे लक्ष देणारी व्यक्ती म्हणून तामखडे या खऱ्या अर्थाने जनतेच्या उमेदवार आहेत असे नागरिकांनी सांगितले. त्यांच्या कार्यामुळे स्थानिक तरुणाई, महिला वर्गात नवचैतन्य निर्माण झाले असून सेवा हाच धर्म ही भूमिका घेऊन त्या निवडणुकीच्या मैदानात उतरणार असल्याचे बोलले जात आहे.

## स्पर्धात्मक रॅश ड्रायव्हिंग करणाऱ्या बाईकर्सना पोलिसांनी शिकवला धडा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

वाशी सेक्टर 17 ते बेलापूर असा पामबीच रोडवर बायकर्सने त्यांच्या परदेशी बनावटीच्या दुचाकी या भन्नाट वेगाने हाकण्याच्या स्पर्धा करत असल्याबाबत नागरिकांनी तक्रारी केल्या होत्या. या स्पर्धात्मक रॅश ड्रायव्हिंग करणाऱ्या बाईकर्सना पोलिसांनी धडा शिकवत तिघां विरोधात नेरूळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. प्रणव पद्माकर जाधव (राहणार वाकोला ब्रिज नेहरूनगर मुंबई), सूर्यदेव सिंह सर्जेराव देसाई (राहणार टिळक नगर चेंबूर), अभिषेक देवदास साबळे (राहणार जय मल्हार संस्था अपार्टमेंट शेडुंग गाव) अशी तिघांची नावे आहेत.

19 नोव्हेंबर रोजी नेरूळ पोलीस ठाण्याचे वपोनी ब्रह्मानंद नाईकवाडी यांना पामबीच रस्त्यावर तीन ते चार बाईकर स्पर्धात्मक मोटरसायकल भन्नाट वेगाने दिसून आले. त्यांनी स्वतः बाईकरच्या पाठीमागून पाठलाग करून पामबीच रोडवर सारसोळे सिग्नल ते वज्राणी सिग्नल नेरूळ येथे रात्री दीडच्या सुमारास त्यांना आणि त्यांची बाईक रोखून ताब्यात घेतली. या प्रकरणी तिघा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.



# गाणी-कोंढे ग्रुप ग्रामपंचायतीत ‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना’ची यशस्वी अंमलबजावणी

## पारदर्शकता, जलसंवर्धन आणि लोकसहभागाचा उत्तम संगम

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी -अनिकेत मोहित**

श्रीवर्धन तालुका | ग्रामीण विकासाला नवी दिशा देण्यासाठी राबवण्यात येत असलेल्या ‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना’ला श्रीवर्धन तालुक्यातील गाणी-कोंढे ग्रुप ग्रामपंचायतीने उत्स्फूर्त प्रतिसाद देत आदर्श निर्माण केला आहे. प्रशासनाचा पारदर्शक कारभार, डिजिटल सुविधा, पर्यावरणपूरक उपक्रम आणि लोकसहभाग या सर्व गोष्टींचा सुंदर मेळ घालत ग्रामपंचायतीने गावाच्या प्रगतीचा व्यापक आराखडा प्रत्यक्षात उतरवला.

ग्रामपंचायतीकडून सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे प्रशासनातील पारदर्शकता. गावाने स्वतःची वेबसाईट सुरू करून विकासकामांची माहिती, निधीचा वापर आणि विविध शासकीय दस्तऐवज ग्रामस्थांपर्यंत थेट पोहोचवण्याची व्यवस्था केली. आधुनिक युगातील ही पायरी गावाला ‘डिजिटली सशक्त’ बनवणारी ठरली. सर्वांसाठी खुला असलेला ग्रामपंचायत वाचनालयाचा उपक्रमही या बदलाचा एक महत्त्वाचा भाग ठरला.

लोकांना तालुक्याच्या ठिकाणी जाण्याची गरज भासू नये म्हणून ग्रामपंचायतीने गावातच विशेष शिबीर आयोजित केले. जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी प्रमाणपत्रे असोत किंवा महसूल विभागातील ७/१२ तसेच मालमत्ता पत्रक — आवश्यक कागदपत्रे लोकांच्या हातात गावातच देऊन प्रशासनाने ‘दारोदारी सेवा’ ही संकल्पना खऱ्या अर्थाने पूर्ण केली.



गावाच्या विकासात जलसंवर्धनाचा मुद्दा नेहमीच महत्त्वाचा असतो. हे लक्षात घेऊन ग्रामस्थांनी आणि अधिकाऱ्यांनी मिळून श्रमदानातून वनराई बंधारा उभारला. गावकऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नातून उभा राहिलेला हा बंधारा परिसरातील पाणीपातळी वाढवण्यासाठी आणि उन्हाळ्यातील टंचाई कमी करण्यासाठी मोलाचा ठरणार आहे.

कृषी हा गावाचा कणा असल्याने शेतकऱ्यांचे सक्षमीकरणही अभियानाचा महत्त्वाचा भाग ठरला. महिलांसह सर्व शेतकऱ्यांचे गट स्थापन करून सामूहिक विकासाला प्रोत्साहन देण्यात आले. मेहनती आणि प्रयोगशील शेतकऱ्यांचा सन्मान करून त्यांच्या कार्याचा गौरवही करण्यात आला, ज्यातून कृषी क्षेत्रातील नाविन्याला बळ मिळाले.

गावातील कोणताही घटक विकासापासून वंचित राहू नये याची काळजीही ग्रामपंचायतीने घेतली. आयुष्मान भारत कार्डांचे वाटप, दिव्यांगांना ओळखपत्रे आणि सोलर दिव्यांचे वितरण अशा उपक्रमांमधून सामाजिक सुरक्षा व्यवस्थेला बळ मिळाले.

या सर्व कामांची पाहणी करण्यासाठी पंचायत समिती श्रीवर्धनचे गटविकास अधिकारी माधव जाधव, कृषी विस्तार अधिकारी श्रीमती राधा कराळे, तसेच स्वदेस फाउंडेशनचे श्री. नाथा कटारे उपस्थित होते. गावाचे तरुण सरपंच आदित्य कासरुंग आणि ग्रामविकास अधिकारी अभिजित माने यांच्या पुढाकारामुळे हा संपूर्ण उपक्रम यशस्वीपणे राबवता आला. कार्यक्रमात ग्रामस्थ, महिला, युवक आणि पंचायतीचे सदस्य — विशेषतः सुदाम शिगवण, अनंत शिगवण, रामचंद्र शिगवण आणि सदस्य निखिल कदम — यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.

‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना’ची शिवधारणा गाणी-कोंढे ग्रामपंचायतीने ज्या प्रामाणिकतेने आणि तन्मयतेने अंमलात आणली आहे, ती निश्चितच तालुक्यातील इतर ग्रामपंचायतींसाठी प्रेरणादायक दिशा ठरू शकते. ग्रामीण प्रशासनाने लोकसहभाग, पारदर्शकता आणि विकास यांचा योग्य समन्वय साधला तर गाव कसे बदलू शकते याचे जिवंत उदाहरण म्हणून गाणी-कोंढे गावाचे नाव आता पुढेही घेतले जाईल.

---

## कोपरा येथील रेशन दुकानावर कारवाई करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

खारघर शहरातील कोपरा गाव मधील रेशनिंगच्या दुकानावर कारवाई करण्याची मागणी सिद्धेश विष्णू ठाकूर यांनी पुरवठा अधिकारी पनवेल यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. खारघर सेक्टर 10, कोपरा गाव येथे रेशनिंगचे दुकान असून त्या ठिकाणी रेशनिंगच्या धान्याची काळया बाजारात विक्री होत असल्याचा आरोप सिद्धेश ठाकूर यांनी केला आहे. पनवेल शहर आणि तालुक्यात एकूण रेशनिंगचे 199 दुकाने आहेत. सर्वच ठिकाणी अशा प्रकारे रेशनिंगच्या धान्याची काळया बाजारात विक्री होत असल्याचे या निमित्ताने समोर आले आहे. मात्र पुरवठा अधिकारी कारवाई करत नसल्याने या दुकानदारांचे फावत आहे. अशा प्रकारे धान्य काळया बाजारात विकणे कायद्याने गुन्हा आहे. त्यामुळे तहसीलदारांनी स्वतः लक्ष देऊन अशा दुकानदारांवर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे

---

## भाएसोच्या विद्यासंकुलनातील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या वतीने 64 वा राष्ट्रीय फार्मसी सप्ताह साजरा

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

येथील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या विद्या संकुलनातील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या वतीने 64 वा राष्ट्रीय फार्मसी सप्ताह गुरुवार 20 नोव्हेंबर रोजी पोलिस उपनिरीक्षक नरेश थळकर,कॉलेजचे प्राचार्य डॉ.आशिष पगारिया, डी फार्मसी एच ओ डी अनघा सामंत,बी फार्मसी एच ओ डी डॉ.समिर पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

15 नोव्हेंबर ते 22 नोव्हेंबर या राष्ट्रीय फार्मसी सप्ताह निमित्त नागरिकांना लसीकरणाचे महत्व व त्याची जागृती तसेच फार्मसीची ओळख होण्याच्या उद्देशाने गुरुवार 20 नोव्हेंबर रोजी शहरातून रॅली काढण्यात आली. सदरील रॅली ग्रामदैवत श्री जोगेश्वरी मातेच्या मंदिरातून तुमचे आरोग्य आमचे ध्येय, लसीकरण करा आजच, निरोगी समाज म्हणजे लसीकरण केलेला समाज , फार्मसीस्ट वर विश्वास ठेवा असा घोषणा देत निघालेली रॅली खडक आळी. अंगार आळी. के. एम जी.विभाग ,गांधी चौक, खुमाचा नाका,छत्रपती शिवाजी महाराज बाजारपेठ मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकात




रॅलीचा समारोप करण्यात आला.या रॅलीत अधीक्षक राजेश सुतार ,समन्वयक जयेंद्र राणे, भारत कामथे, सुरज मोकल,पोलिस हवालदार अथर्व पाटील यांच्यासह बी फार्मासी व डी फार्मासीचे सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनी सहभागी झाले होते.

---

## इच्छुक उमेदवारांना रोजगाराची संधी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर**

**नागपूर,दि. 19:** जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, नागपुरच्या अधिपत्याखालील सैनिकी मुलांचे-मुलींचे वसतीगृह तसेच सैनिकी विश्रामगृह, हिस्लॉप कॉलेजसमोर, सिव्हिल लाईन्स नागपूर येथे अशासकीय माळी (1) पदासाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात 13 हजार 271 रुपये एवढ्या एकत्रित मानधनावर कंत्राटी पध्दतीने पद भरावयाचे आहे. इच्छुक उमेदवारांनी 28 नोव्हेंबर रोजी शुक्रवारी दुपारी 3 वाजेपर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, प्रशासकीय इमारत क्रमांक 1, तिसरा माळा, सिव्हील लाईन, नागपूर येथे अर्ज सादर करावे, असे आवाहन जिल्हा सैनिक अधिकारी, नागपूर यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत कार्यालयाच्या दुरध्वनी क्रमांकावर ०७१२-२५६११३३ संपर्क साधावा. माजी सैनिक, माजी सैनिक विधवा तसेच त्यांच्या पाल्यांना प्राधान्य देण्यात येईल.

---

## प्रभाग क्र. १४, सांगली–मिरज–कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील विकासकामांचे आमदार सुधीरदादा गाडगीळ यांच्या हस्ते लोकार्पण

### रु. ४० लाखांच्या निधीतून पूर्ण व पूर्णत्वास जाणाऱ्या कामांचा शुभारंभ

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी कौतुक नागवेकर**

सांगली, दि. २० नोव्हेंबर — प्रभाग क्रमांक १४ मधील विविध महत्त्वपूर्ण विकासकामांसाठी आमदार सुधीरदादा गाडगीळ यांच्या विशेष प्रयत्नांतून सांगली–मिरज–कुपवाड महानगरपालिका व नगरविकास योजनेअंतर्गत एकूण ₹४० लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या अनुषंगाने पूर्ण झालेल्या तसेच पूर्णत्वास जाणाऱ्या कामांचे लोकार्पण आमदार गाडगीळ यांच्या हस्ते करण्यात आले.

मंजूर विकासकामांमध्ये खालील कामांचा समावेश :

1 एस.टी. स्टॅण्ड ते गरवारे कॉलेज मार्गाचे रस्ता निर्मितीकार्य
— निधी : ₹16,14,000

2 मारुती चौक येथे पावसाच्या पाण्याच्या निचऱ्यासाठी सी.डी. वर्क
— निधी : ₹11,60,000

3 विवेकानंद मंडळ – सतीश पवार घर – खाली सरकारी घाट रस्ता विकास

तसेच गावभाग, जोशी गल्ली रस्ता सुधारणा
— निधी : ₹12,04,000




या कामांमुळे प्रभागातील वाहतूक सुलभता, पावसाळ्यातील निचरा व्यवस्था सुधारणा, तसेच नागरिकांच्या मूलभूत सुविधा अधिक सक्षम होणार असल्याचे प्रतिपादन या वेळी करण्यात आले.

उद्घाटनप्रसंगी आमदार सुधीरदादा गाडगीळ, भाजपा राज्य परिषद सदस्य प्रकाश (तात्या) बिरजे, माजी नगरसेविका भारती दिगडे, उर्मिला बेलवलकर, माजी नगरसेवक सुबराव मद्रासी, युवराज बावडेकर, रणजीत सावर्डेकर, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख केदार खाडिलकर, जिल्हा उपाध्यक्ष विजय साळुंखे, जिल्हा सरचिटणीस स्मिता भाटकर, जिल्हा सचिव उदय मुळे, मंडल अध्यक्ष रवींद्र वादवणे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष शांतिनाथ कर्वे, जैन प्रकोष्ठचे प्रशांत गौंडाजे, उद्योग आघाडीचे शरद नलवडे, संदीप कुकडे, माधुरी वसगडेकर, स्मिता पवार, मनीषा कुकडे, सुलभा जोशी, मोहन जामदार, नितीनकाका शिंदे, सौ. आशा शिंदे, प्रथमेश वैद्य, शुभम चव्हाण, अनिकेत खिलारे, प्रताप बिरजे, गजानन नलावडे, स्नेहजा जगताप यांसह सर्व भाजपा पदाधिकारी, सदस्य, बूथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने परिसरातील नागरिक उपस्थित होते.

---

## धारावी काळा किल्ला डेपो व्यवस्थापकाची ज्येष्ठ नागरिकांनी भेट घेऊन, समस्यांचा वाचला पाढा!

**दैनिक युवक आधार**
**मुबंई (दत्ता खंदारे )**

बेस्ट वाचवण्यासाठी व प्रवाशांच्या सोयीनुसार धारावी काळा किल्ला डेपोतून सुटणाऱ्या बस क्रमांक ५२,४६,१६४,१७६,सी ७२ आणि ३०५,३१२,४६३ या बस सेवा प्रत्येक दहा मिनिटाच्या अंतरावर वेळेवर सोडाव्यात या मागणीचे संयुक्त निवेदन फेस्कॉम संलग्न धारावीतील हॅप्पीनेस ज्येष्ठ नागरिक संघ व ज्येष्ठ नागरिक झेंडा ग्रुप यांच्या वतीने देण्यात येऊन वरील मागणी करण्यात आली होती. त्यानंतर आलेल्या वृत्तपत्रातील बातम्या हे देखील डेपो व्यवस्थापक यांच्यापर्यंत पोहोचल्या होत्या. दि.१८ नोव्हेंबर रोजी धारावी ९०फूट रोड मार्गे जाणाऱ्या बस सेवेना विलंब झाल्याने व त्याचा लाभ इतर खाजगी वाहतूक घेत असल्याचे लक्षात आल्यानंतर डेपो व्यवस्थापक यांच्याकडे लेखी तक्रार करण्यात आली. त्यानंतर त्यांनी दि. १९ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी बारा वाजता ज्येष्ठांच्या शिष्टमंडळांना भेटीची वेळ देऊन प्रत्यक्षात काळा किल्ला डेपो कार्यालयात ज्येष्ठांच्या शिष्टमंडळाशी भेटून



निवेदनातील मागणीच्या प्रश्नांवर सकारात्मक चर्चा घडवून आली.यावेळी दिलीप गाडेकर, रंजीत खंदारे, परशुराम जाधव,विष्णू कटके यांच्यासोबत श्री नितीन वाघमारे साहेब डेपो व्यवस्थापक व वाहतूक अधिकारी श्री बाळकृष्ण चौधरी यांनी चर्चा करून प्रत्येक बस पंधरा मिनिटांच्या अंतरावर कशी सोडता येईल तसेच वाढीव बस ताफा व नऊ मीटरच्या,बारा मीटरच्या बस गाड्या जास्तीत जास्त कशा सेवेत आणता येतील यावर देखील चर्चा केली. सोबत बस थांब्यासमोरील बेकायदेशीर शेअर टॅक्सी, रिक्षा हटवण्याबाबत बेस्ट व्यवस्थापन कडून वाहतूक पोलीस यांच्याकडे तक्रार देऊन बस प्रवासी सुरक्षित राहतील याची काळजी घेऊ असे आश्वासन यावेळी जेष्ठांच्या शिष्टमंडळांना देण्यात आले.

---

## विद्यार्थ्यांनी विज्ञानासोबत क्रीडा क्षेत्रातही नैपुण्य दाखववावे – दत्तात्रेय जोंधळे

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

**निफाड** – आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षण क्षेत्रात मोठे बदल होत असून हे बदल सर्वांनी स्वीकारणे अत्यावश्यक आहे. विद्यार्थ्यांनी विज्ञानाची कास धरत ज्ञानार्जनाबरोबर मोबाईलच्या युगात क्रीडा क्षेत्रातही आपले नैपुण्य दाखवावे, असे प्रतिपादन महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष दत्तात्रेय जोंधळे यांनी केले.

न्यू इंग्लिश स्कूल, पालखेड येथील सदिच्छा भेटीदरम्यान ते व्यासपीठावरून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्याध्यक्ष दत्तात्रेय जोंधळे, उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे,



मुख्याध्यापक अशोक शेळके, पुंजाहरी दिघे आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी जोंधळे यांनी शाळेमध्ये राबविण्यात येणारे उपक्रम, उपलब्ध भौतिक सुविधा, शाळेचा उंचावणारा प्रगतीचा आलेख, गुणवत्ता आणि अध्यापनातील प्रामाणिकता यांचा आढावा घेत समाधान व्यक्त केले.

यानंतर आंतरशालेय हिवाळी क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन कार्याध्यक्ष जोंधळे व उपाध्यक्ष थेटे यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या क्रिकेट सामन्यांचा त्यांनी मनमुराद आनंद घेतला आणि स्वतः मैदानात उतरून बॅटिंगही केली. त्यांच्या या सहभागामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले.

या कार्यक्रमाला मुख्याध्यापक अशोक शेळके, निलेश गवांदे, दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्धवळे, संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे, राहुल दवते, वैशाली मोते, सागर जाधव, राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव, संजय कोकतरे, कविता ढोमसे, सारिका पवळे, सुरेश गांगुर्डे, रामदास पवार, नदीम तांबोळी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## रिक्षा चालक यांना भष्टाचार निर्मुलन याविषयावर विशेष मार्गदर्शन प्रमुख मा अरुंधती येळवे पोलीस निरीक्षक



नवी मुंबई पोलीस उपअधीक्षक भष्टाचार निर्मुलन प्रतिबंध प्रमुख मा धर्माराज सोनके साहेब यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली नवी मुंबई आपला माणूस श्री दिलीप किसनराव आमले अध्यक्ष शिव वाहतूक सेना नवी मुंबई यांच्या सहकार्याने नवी मुंबई भष्टाचार निर्मुलन प्रतिबंध मा सौ अरूंधती येळवे मॅडम महिला पोलीस इन्स्पेक्टर नवी मुंबई यांच्या वतीने नेरूळ नगरातील अनेक प्रमुख ठिकाणी भष्टाचार निर्मुलन प्रतिबंध याविषयावर विशेष संवाद मार्गदर्शन आयोजित करण्यात आले यावेळी नवी मुंबई मधील अनेक रिक्षा चालक टॅक्सी चालक व्यावसायिक व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते यावेळी मा सौ अरूंधती येळवे मॅडम यांच्या उपस्थितीत प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्या रिक्षा चालक यांना सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले

( दैनिक युवक आधार )

# चिरनेर दहावी 1985 ग्रुप कडून किल्ल्यांची सफर !

## किल्ल्यांच्या ठाणे आणि पालघर जिल्ह्यात एक अनोखा प्रवास !

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी / एम.डी. भोईर**

सेकंडरी स्कूल चिरनेर दहावी १९८५ ग्रुप ची सहल १६ आणि १७ नोव्हेंबर रोजी ठाणे आणि पालघर जिल्ह्यात गेली होती.

या सहलीत त्यांनी वसई किल्ला, जीवदानी माता, नारंगी जेटी,शिरगाव किल्ला, शिरगाव बीच, डहाणू किल्ला, डहाणू बीच, महालक्ष्मी मंदिर, वज्रेश्वरी मंदिर, गरम पाण्याची कुंडे,खारघर येथील इस्कॉन श्रीकृष्ण मंदिर पहिले. वसई किल्ल्यातील वज्रेश्वरी देवी मंदिर आणि नागेश्वर मंदिर पाहिले.

प्रत्येक किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी ..जय शिवराय या घोषणांनी आसमंत दुमदुमून जात होता.



व्हॉट्स ॲप च्या माध्यमातून या ग्रुपचे ॲडमिन पत्रकार मिलिंद खारपाटील यांनी २०१८ साली सर्वांना एकत्र आणले. दरवर्षी गेट टुगेदर आणि सहली आयोजित केल्या जातात. प्रत्येक सहलीत किमान एक किल्ला पहायचा असे ठरले आहे. या सहलीत या मित्रांनी वसई, शिरगाव, डहाणू हे तीन किल्ले पाहिले.जर छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांना साथ देणारे मावळे यांचा इतिहास जागृत ठेवायचा असेल,पुढील पिढीपर्यंत आपल्या पूर्वजांनी देव,देश,धर्म यांच्यासाठी केलेले बलिदान यांची माहिती राहण्यासाठी किल्ले शाबूत राहिले पाहिजेत. सध्या अनेक किल्ल्यांची होणारी पडझड, स्वच्छता याकडे सरकारने लक्ष देण्याची गरज आहे.आणि या ग्रुपकडून यासंदर्भात शासन दरबारी नक्कीच आवाज उठवला जाईल.

या सहलीत त्यांनी कोकणला लाभलेल्या अथांग अरबी समुद्राचे दर्शन घेतले. नारंगी जेटी येथून रोरो सेवेचा अनुभव घेताना समुद्र सफर केली .वाडा, भिवंडी,पालघर येथील आदिवासी जीवनशैली.. शेती ,त्यांचे राहणीमान यांची विस्तृत माहिती घेतली. जीवदानी आणि वज्रेश्वरी येथे देवीचे दर्शन घेताना जीवदानी माते की जय, वज्रेश्वरी माते की जय अशा जोरदार घोषणा दिल्या.सर्वांनी छानशी फोटोग्राफी केली.

या सहलीत धार्मिक, ऐतिहासिक आणि उत्तर कोकणातील निसर्ग सौंदर्याचा मनमुराद आनंद लुटला. शिरगाव आणि डहाणू बीचवर धम्माल मस्ती केली.

समुद्रकिनारी उसळणाऱ्या लाटा, घोंगावणारा वारा, यामध्ये समुद्र किनाऱ्यावरील वाळूतून चालण्याचा एक झक्कास अनुभव घेतला.या सहलीत मिलिंद खारपाटील, सूर्यकांत म्हात्रे, पद्माकर फोफेरकर, गजानन फोफेरकर, प्रकाश फोफेरकर,प्रकाश नारंगीकर, सुरेश केणी, चंद्रकांत गोंधळी इत्यादी वर्गमित्र सहभागी झाले होते.

यापुढील सहलीत देखील असेच किल्ले दर्शन करुन किल्ल्यांच्या संवर्धनासाठी शासनदरबारी आवाज उठविण्याचे ठरवून या सहलीची सांगता झाली.

गड किल्ल्यांनी राखले स्वराज्य !!

गड किल्ल्यांनी स्थापले स्वराज्य !!


गड किल्ल्यातून महाराष्ट्र घडला !!

# जय गणेश मित्र मंडळ मुंबई, दिलीप नामे आणि सहकारी यांना कलगी तुरा आदर्श आयोजक पुरस्कार-२०२५ जाहीर

## रविवार दि. ७ डिसेंबर २०२५ रोजी भारतरत्न लता मंगेशकर नाट्यगृह मीरा रोड पूर्व येथे भव्यदिव्य स्वरूपात संपन्न होणार पुरस्कार वितरण कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

जय गणेश मित्र मंडळ मुंबई दिलीप नामे आणि सहकारी यांच्या कार्याची दखल घेत कलगी तुरा लोककला संवर्धनपर अविरत कार्यरत असणारी कलगी तुरा समाज उन्नती मंडळ मुंबई-(महाराष्ट्र राज्य) संस्थेच्या वतीने कलगी तुरा आदर्श आयोजक पुरस्कार-२०२५ साठी निवड झाल्याचे पत्र श्री.संतोष धारशे (सरचिटणीस) कलगी तुरा समाज उन्नती मंडळ मुंबई यांनी दिले आहे.







कोकणातील कलगी तुरा लोककला आणि शाहिरी परंपरेला प्रोत्साहन देणारी गेली ६५ वर्ष कलगी तुरा लोककला संवर्धनपर अविरत कार्यरत असणारी कलगी तुरा समाज उन्नती मंडळ मुंबई-(महाराष्ट्र राज्य) संस्थेच्या वतीने मुंबई नगरीत प्रथमच गौरी गणेश नृत्य स्पर्धा-२०२५ आणि दिनदर्शिका -२०२६ प्रकाशन तसेच शाहीर गुणगौरव सोहळयाचे भव्य दिव्य आयोजन रविवार दि. ७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत भारतरत्न लता मंगेशकर नाट्यगृह,दहिसर चेक नाका जवळ, महाजन वाडी, मीरा रोड पूर्व येथे भव्यदिव्य स्वरूपात संपन्न होणार आहे.

कलगी तुरा आदर्श आयोजक पुरस्कार-२०२५ हा मानाचा पुरस्कार जाहीर झाल्यामुळे कोकणसह मुंबईतील शक्ती-तुरा मंडळ, नमन मंडळ यांच्या तर्फे जय गणेश मित्र मंडळ, दिलीप नामे आणि सहकारी यांच्यावर अभिनंदन सह शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# अडसुळे दाम्पत्यांकडून गुणवंत विद्यार्थ्यांना स्मार्टवॉच वाटप

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**



लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या ७५ व्या अमृत महोत्सव निमित्ताने अडसुळे दाम्पत्यांकडून गुणवंत विद्यार्थ्यांना स्मार्टवॉच वाटप करण्यात येणार आहे.

गतवर्षी अजित अडसुळे आणि उषा अडसूळे या दांपत्याकडून गुणवंत विद्यार्थ्यांना टॅब वाटपाचा कार्यक्रम मोठा उत्सवात पार पडला होता. यानंतर पुन्हा रविवार दि. २३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेपाच वाजता विपग्यर हायस्कूल य सेक्टर १५, खारघर येथील मैदानावर इयत्ता दहावी आणि बारावीतील प्रथम, द्वितीय, तृतीय श्रेणीतील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमुख मान्यवर खासदार रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांच्या उपस्थितीत स्मार्ट वॉच तसेच प्रशस्तीपत्र देऊन गुणगौरव करण्यात येणार आहे.

# न्हावा येथील मानसी भोईर सीए उत्तीर्ण

## महेंद्रशेठ घरत यांनी केले अभिनंदन

**दैनिक युवक आधार**
**उलवे, वार्ताहर**

न्हावा येथील मानसी शिवनाथ भोईर ही सीएच्या परीक्षेत नुकतीच पहिल्या प्रयत्नांमध्ये उत्तीर्ण झाली आहे. त्याबद्दल आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी तिचे 'सुखकर्ता' बंगल्यावर अभिनंदन केले. गुणवंती शिवनाथ भोईर यांची कन्या, तर माजी सरपंच हरिश्चंद्र बाळाराम म्हात्रे यांची ती भाची आहे. रोटरी एज्युकेशन सोसायटीमध्ये तिचे दहावीपर्यंतचे शिक्षण झाले, तर महाविद्यालयीन शिक्षण उरण एज्युकेशन सोसायटी, तर बीबीए पुणे विद्यापीठाच्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठात बेलापूर येथे झाले. सध्या मानसी उरण-बोरी येथे स्थायिक असून आगरी समाजातील मुलगी सीए झाल्याने तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




# पनवेल शहर पोलिसांच्या विशेष पथकाने केला विनापरवाना अवैधरित्या विक्रीसाठी गावठी दारू निर्मितीचा साठा जप्त उध्वस्त

**दैनिक युवक आधार**
**पनवेल द(वार्ताहर):**

पनवेल शहर पोलिसांच्या विशेष पथकाने विनापरवाना अवैधरित्या विक्रीसाठी गावठी दारू निर्मितीचा साठा जागीच जाऊन उध्वस्त केला असून या प्रकरणी एकाला तब्यत घेतले आहे. तालुक्यातील भांगरपाडा गाव जवळील प्रस्तावित डी-मार्ट जवळील जंगलात खाडीच्या बाजूला विनापरवाना अवैधरित्या विक्रीसाठी गावठी दारू निर्मिती केली जात असल्याची खबर वपोनि नितीन ठाकरे यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण, पोलीस शिपाई सूर्यकांत काकडे, पोलीस हवालदार कारंडे, पोलीस शिपाई गाभाले, पोलीस हवालदार प्रवीण मेथे आदींच्या पथकाने सदर ठिकाणी जाऊन जवळपास हजारो रुपये किमतीची कच्ची दारूचे नवसागर द्रव्य जागीच नष्ट केले तसेच त्या ठिकाणी असलेला पातेले, काचेच्या बाटल्या व इतर वस्तू हस्तगत केल्या आहेत.



# चांगलं केलं तर फळ सुद्धा चांगलं मिळणार

## जन सेवा हीच ईश्वर सेवा

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

चांगलं केलं तर फळ सुद्धा चांगलं मिळणार जन सेवा हीच ईश्वर सेवा कॅन्सर विरोधात लढणारा रक्षक हा नवी मुंबई विशेष सन्मान पुर्वक प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन पुरस्काराने गौरविण्यात आले अनेक वेळा आरोग्य शिबीर आयोजित करून अनेकदा मोफत वैद्यकीय उपचारासाठी रूग्णांना सुविधा उपलब्ध करून देण्यात आपलं माणूस म्हणून जगताना अनेक रूग्णांना वेळी उपचार मिळाला यामुळेच मला कॅन्सर विरोधात लढणारा रक्षक हे सन्मान पुर्वक पुरस्कार प्रमाणपत्र देऊन मला गौरविण्यात आले या बदल इंडियन कॅन्सर ट्रिटमेंट सेंटर यांचे मनापासून मनापर्यंत धन्यवाद आपला माणूस श्री दिलीप किसनराव आमले




# वैश्विक विकास संस्थेकडून शैक्षणिक साहित्याचे वाटप

## प्रेमलता झरकर यांच्या जयंती चे औचित्य

**दैनिक युवक आधार**
**राजू गायकवाड उमरखेड तालुका प्रतिनिधी**

वैश्विक विकास संस्था, मुळावा ही स्वयंसेवी संस्था मागील २३ वर्षापासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून संस्थेचे शैक्षणिक आणि नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन या क्षेत्रात कार्य सुरू आहे. गोरगरीब विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या प्रवाहात कायम टिकले पाहिजे यासाठी संस्थेने द्वारा एक छोटासा प्रयत्न करण्यात आला. यामुळे गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीला चालना मिळण्यास मदत होईल या उदात्त हेतूने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेच्या संस्थापक सदस्य स्वर्गीय प्रेमलता वासुदेवराव झरकर यांच्या जयंती निमित्त जिल्हा परिषद शाळा हातला व जिल्हा परिषद शाळा पिंपळदरी येथे सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले यावेळी हातला येथे शाळेचे उपाध्यक्ष खडसे आणि मुख्याध्यापक दिगांबर ताडोळे उपस्थित होते तर पिंपळदरी येथे मुख्याध्यापक राजू पोफाळकर , सोनटक्के मॅडम आणि फरहाना मॅडम, आणि वैश्विक विकास संस्था मुळावा या संस्थेचे अध्यक्ष अजय झरकर ,कार्यकर्ते जीगीष वाकडे , कृष्णा खडसे तसेच महाराष्ट्र इंग्लिश स्कूल मुळावा च्या माधवी राठोड , मयुरी कदम , सृष्टी सूर्यवंशी , स्वराली देवसरकर , आराध्या देशमुख नंदिनी ठाकरे व अमोघ झरकर उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. दोन्ही शाळेला वैश्विक विकास संस्था कडून भेट देण्यात आली.




# कळमनुरी नगरध्यक्ष पदासाठी वंचित बहुजन आघाडी च्या उच्चाशिक्षित सौ अपूर्वा राजू कांबळे मैदानात.

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी विजय खुडे**

अगामी नगर पालिका निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने प्रभावी पाऊल उचलत कळमनुरी नगराध्यक्षा पदासाठी उच्चाशिक्षित सौ अपूर्वा राजू कांबळे यांची उमेदवारी जाहीर झाल्याने सर्वांना विचारात पाडले आहे. अशी सर्वत्र चर्चा आहे. कारण राजू कांबळे हे वंचित बहुजन आघाडी चे तालुका अध्यक्ष असल्याने त्यांचे सर्वत्र नाव असल्याने प्रभावी भाषण व सखोल सामाजिक अभ्यासाच्या जोरावर सर्व सामान्य लोकांचे प्रश्न सोडवित असल्याने त्यांचे जण सामान्य लोकं त्यांना मानणारे खूप लोकं असल्याने त्यांच्या उच्चाशिक्षित पत्नी सौ अपूर्वा राजू कांबळे यांची नगराध्यक्ष पदाची उमेदवारी बाकीच्याना जड जाणारी आहे. विविध सर्व समावेशक विकास महिला नेतृत्वाला प्रोत्साहन आणि सामाजिक न्यायाचा मुल्यांवर आधारित प्रचार आराखडा वंचित बहुजन आघाडी लवकरच जाहीर करणार आहे कळमनुरी त राजकारणाच्या नव्या समीकरनाला सुरवात झाली आहे वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार नगराध्यक्ष पदासाठी सौ अपूर्वा राजू कांबळे व नगरसेवक पदासाठी परवीन निसा पठाण (तुराबखा पठाण). दिनेश वाढवे.इरशाद परवीन मो गौस. राष्ट्रपाल वाढवे. दिनेश कदम. अश्विनी बलखंडे. हे उमेदवार वंचित चे अधिकृत उमेदवार असून कळमनुरी नगरपालिकेत पहिल्यांदाच बदल होण्याची चर्चा सर्वत्र सुरु आहे

> कळमनुरी शहरातील सर्वांगीण विकास करण्यासाठी मी माझ्या उच्च शिक्षणा चा फायदा मी शहर विकासासाठी करणार असून सर्व सामान्य जनतेचे प्रश्न व राखडलेल्या सर्व कामे पूर्ण करण्यासाठी राजकारणात उतरली आहे
>
> सौ अपूर्वा राजू कांबळे
> वंचित बहुजन आघाडी कळमनुरी



# शिवरायांचा मुस्लिम मावळा समीर शेख लोकशक्ती राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने सन्मानित

## सिने अभिनेत्री चित्रा दिक्षित, अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. राठोड यांच्या हस्ते झाला सन्मान

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी -मारुती सत्रे**

सामाजिक व पत्रकारीच्या माध्यमातून नेहमीच समाजहिताचे उपक्रम राबवणारे, शिवरायांचा मुस्लिम मावळा तथा आ. लोकनेते सुरेश धस यांचे स्वीय सहाय्यक, आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील सर्व सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेले समीर शेख शनिवारी दैनिक लोकशक्तीच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त 'लोकशक्ती महाराष्ट्र गौरव आदर्श शिक्षक' हा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित झाले.




सिने अभिनेत्री चित्रा दिक्षित, नागपूर येथील अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. दत्ताराव राठोड, 'गावरान मस्ती' फेम वैभव कुऱ्हाडे (गंठणकुमार), ज्येष्ठ साहित्यिक ऐश्वर्य पाटेकर, डॉ. कैलास दौंड, 'झुंजार नेता'चे उपसंपादक उत्तमराव बोडखे, संपादक विजय लेंडाळ, सहसंपादक इम्रान शेख, पत्रकार जावेद सय्यद व इतर मान्यवरांच्या हस्ते दि. १५/११/२०२५ रोजी लोकशक्ती राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार समीर बादशहा शेख यांना देऊन सन्मान करण्यात आला.

तर या आगोदर ०७/०९/२०२५ या दिवशी राज्यस्तरीय युवक आधार शिव रत्न पुरस्कार व २०२४/२५ या वर्षाचा राज्यस्तरीय मौलाना अब्दुल कलाम आझाद समाजसेवा पुरस्कार व २०२२/२३ यशवंत रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. समाजात हिंदू-मुस्लिम ऐक्य आणि सलोखा टिकवण्यासाठी शेख यांनी केलेल्या प्रयत्नांची आजवर विविध स्तरावर दखल घेण्यात आली. सामाजिक क्षेत्रातील त्यांचे योगदान, पत्रकारितेत मानले जाणारे प्रश्न आणि जनतेशी असलेला दैनंदिन संवाद यामुळेच त्यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार प्राप्त झाल्याचे आयोजकांनी सांगितले आहे.

या सोहळ्याला ज्येष्ठ पत्रकार उत्तमराव बोडखे, ग्रामविस्तार अधिकारी बाळासाहेब थोरवे, सरपंच दत्तात्रय खोटे, सरपंच परिवंत गायकवाड, सरपंच अजित घुले, मुख्याध्यापक साईनाथ बोडखे, वाल्हेकर, विष्णू नन्नवरे, सरपंच विठ्ठल राख, आनंद देवा, राजेंद्र बोराडे, प्रविण खाडे, अध्यक्ष महेश भगत, बाबासाहेब भोसले, पत्रकार मारुती सत्रे, महेश खिलारे, उमेश सुरवसे, अर्जुन थोरात, अशोक गर्जे आदी मान्यवर उपस्थित होते. समाजसेवक समीर शेख यांना सर्व स्तरावरून कौतुक व शुभेच्छा यांचा वर्षाव होत आहे.

# मालेगाव तालुक्यातील चिमुकलीवर झालेल्या अत्याचार आणि निर्गुण हत्या करणाऱ्या आरोपीला फाशीची शिक्षा द्या

## युवा ग्रामीण पत्रकार संघ माहूर यांची निवेदनाद्वारे मागणी

**युवक आधार**
**माहुर:(प्रतिनिधी) सय्यद ईसा**

मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथील एका चिमुकलीवर एका नराधमाने अत्याचार करून तिची निर्गुतपणे हत्या केली अशा नराधमाला फाशीची शिक्षा व्हावी म्हणून युवा ग्रामीण पत्रकार संघ माहूर यांच्याकडून माननीय देवेंद्र फडणवीस साहेब मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य माननीय एकनाथ शिंदे साहेब उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना माहूर तहसीलदार तहसील कार्यालय माहूर पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन माहूर यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले आहे घडलेली घटना अत्यंत निंदनीय आहे असे माहूर चे डी.वाय.एस.पी. किरण भोंडवाने व पो.नि.देविदास चोपडे यांनी निवेदन घेतांना सांगितले घडलेल्या घटनेचा निषेध करत युवा

ग्रामीण पत्रकार संघ माहूर यांनी हे निवेदन दिले आहे निवेदनावर तालुका उपाध्यक्ष समाधान कांबळे सय्यद इसा सहसचिव कुंदन तीवडकर शहराध्यक्ष संजय वडस्कर सदस्य यांच्या निवेदनावर स्वाक्षरी आहेत.



www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज
दैनिक **युवक आधार** मराठी

संपादक - संतोष शिवदास आमले

मुख्य संपादक - भारती आमले | उपसंपादक - श्री विलास गायकवाड | कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे | निवासी संपादक- श्री राकेश पाटील | सह संपादक - श्री मुकुंद कांबळे | महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : ३ | अंक : ७३ | शुक्रवार २१ नोव्हेंबर २०२५ | किंमत : ४ रु | पृष्ठ : ८ | RNI MAHMAR/2023/89514







# खांदा कॉलनी सेक्टर एक येथील मल्लनिसार लाईन चोकअप काढण्याचे काम सुरु

**दैनिक युवक आधार**
**खांदा कॉलनी प्रतिनिधी**

खांदा कॉलनी सेक्टर 1 येथील सिडकोच्या गटारांची मेन लाईन जवळपास दोन महिने चोक अप होती याबाबत नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन माजी उपमहापौर सितातार्इ पाटील यांनी पनवेल महापालिकेला पत्रव्यवहार करत या कामाचा पाठपुरावा केला होता याबाबत महापालिकेने दखल घेऊन काम चालू केले होते परंतु दोन महिने लाईन मध्ये कुठे चोक अप सापडत नव्हता अखेर काल चेंबरच्या मेन लाईनचा चोक अप सापडल्या नंतर पनवेल महापालिका कर्मचारी वर्गाने काम लगेच सुरू केले या कामाला तीन ते चार दिवस लागतील असे सांगितले माजी उपमहापौर सितातार्इ पाटील यांनी केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले त्यामुळे सेक्टर एक मधील अनेक सोसायटींनी माजी उपमहापौर सितातार्इ पाटील यांचे आभार मानले





















